# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ९ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## महायुतीच्या माजी मंत्र्यांचे प्रगती पुस्तक तयार; कोणाचा पत्ता कट होणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ मुंबई**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या पाठोपाठ महायुतीमधील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी मंत्र्यांचे प्रगती पुस्तक तयार झालं आहे. महायुतीचे मंत्रिमंडळ स्वच्छ आणि निष्कलंक असावे, अशी दिल्लीतील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या केंद्रीय नेतृत्वाची आग्रही भूमिका आहे. यामुळे काही माजी मंत्र्यांची धाकधूक वाढली आहे.



राज्यातील महायुतीच्या नेत्यांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध नसणाऱ्या त्रयस्थ संस्थेकडून महायुतीच्या माजी मंत्र्यांचे प्रगती पुस्तक तयार करण्यात आलं आहे. महाराष्ट्रातील नव्या राज्य मंत्रिमंडळात स्वच्छ प्रतिमेचे आणि स्वच्छ चारित्र्याच्या आमदारांना स्थान देण्यात येणार आहे. त्यामुळे नव्या मंत्रिमंडळात कोणाला स्थान मिळणार, याकडे साऱ्यांचे लक्ष असणार आहे.

भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्या माजी मंत्र्यांना पुन्हा मंत्रिमंडळात स्थान देऊ नये, अशी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या केंद्रीय नेतृत्वाची ठाम भूमिका आहे. भ्रष्टाचारी माजी मंत्र्यांपेक्षा नव्या दमाच्या तरुण आमदारांना मंत्रिमंडळात संधी द्यावी, अशा राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या केंद्रीय नेतृत्वाच्या स्पष्ट सूचना आहेत. येत्या काही दिवसांत नव्या मंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. त्यामुळे या मंत्रिमंडळात कोणाला संधी मिळणार, हे पाहावे लागेल.

**प्रगती पुस्तकात नापास ठरलेले माजी मंत्री कोण आहेत?**

१) राष्ट्रवादी काँग्रेस
छगन भूजबळ, हसन मुश्रीफ
२ ) शिवसेना शिंदे गट
संजय राठोड, अब्दुल सत्तार

**नव्या मंत्र्यांचा शपथविधी कधी होणार?**

महायुती सरकारच्या नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी १३ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता आहे. राजभवनात राज्यपाल सी पी राधाकृष्णन नव्या मंत्र्यांना शपध देणार आहे. काल झालेल्या बैठकीत १३ तारखेला शपथविधी घेण्यावर चर्चा झाली. त्यानंतर बैठकीत तारखेबाबत एकमत झाल्याची माहिती आहे. तसेच या बैठकीत मंत्रिमंडळात किती आणि कोण असणार यावर देखील चर्चा आणि निर्णय होणार आहे.

## तुम्ही पुन्हा येईल म्हणाले नाहीत, तरी आलात, फडणवीसांनी नार्वेकरांचे असे केले कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ मुंबई**

अध्यक्ष महोदय, मी पुन्हा येईल असं तुम्ही म्हणाला नव्हता. तरी तुम्ही परत आलात त्याबद्दल तुमचे अभिनंदन. तुम्ही खुर्चीला न्याय देण्याचे काम कराल. नाना भाऊ (नाना पटोले यांना उद्देशून) तुम्ही वाट मोकळी केलीत म्हणून नार्वेकरांना संधी मिळाली, असा खोचक टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील भाषणादरम्यान लगावला.



राहुल नार्वेकर यांची पुन्हा विधानसभा अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता. त्याला एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी सहमती दिली. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी राहुल नार्वेकर यांचे फेरनिवडीबद्दल अनुमोदन दिलं. त्याशिवाय विरोधी पक्षाचे आणि गटनेत्यांचे आभार व्यक्त केले. यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सरकारने केलेले आधीचे काम आणि पुढची दिशा कशी असेल, याबाबत वक्तव्य केले.

पाच वर्षांच्या या संक्रमण काळात मीडियाचे तुमच्याकडे लक्ष होतं. नार्वेकर अभ्यासू आणि संयमी व्यक्तिमत्त्व आहे. मुंबई कोकणात अनेक दिग्गजांनी जन्म घेतला. सलग दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्याचा मान फक्त ४ लोकांनाच मिळाला आहे. त्यात आपण गणले जाणार आहात. सभागृहाचे काम आणि नियम यांचा अध्यक्षांचा चांगला अभ्यास आहे, असे कौतुक यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी नार्वेकरांचे केले.

कायदेमंडळात काम करण्यासाठी शिस्त पाळली पाहिजे. लॉबीत चालायला देखील जागा नसते ही अवस्था आहे. एका आमदारासोबत २५ माणसे येतात हे दिसतंय.. मंत्र्यांच्या चेंबरमध्ये घुसायला जागा नाहीय.. इथं नीट काम व्हायला हवं. विधिमंडळात बाजाराप्रमाणे काम व्हायला लागलं आहे, त्याकडे आपण लक्ष द्यावं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभा अध्यक्षांकडे मागणी

## थंडीचं कमबॅक, शेकोट्या पेटल्या पुढचे १० दिवस महाराष्ट्र गारठणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

फेंगल चक्रीवादळामुळे राज्यातून थंडी गायब झाली होती. आता पुन्हा एकदा तापमानाचा पारा घसरण्यास सुरूवात झाली आहे. राज्यातील तापमानात एकच दिवशी ४ अंशांनी घासरले आहे. राज्यातील बहुतांश शहरात हुडहुडी वाढणार आहे. उत्तर भारतात मार्गस्थ होत असलेले पश्चिमी वारे व समुद्र सापटीपासून वाहणारे वारे यामुळे थंडी वाढणार आहे.

फेंगल वादळाचा प्रभाव कमी होण्यास सुरुवात झाल्यामुळे राज्यात पुन्हा एकदा थंडी वाढायला लागली आहे. पुण्यासह राज्यातील तापमानात एका दिवसात ४ अंशांनी घट झाल्याने बहुतांश शहरात हुडहुडी भरण्यास सुरूवात झाली.पुण्यात अचानक रविवारी थंडीत वाढ झाली आणि किमान तापमान १६ अंशांवर नोंदवले गेले. संपूर्ण महाराष्ट्रात पुन्हा पुढील १० दिवस म्हणजे १८ डिसेंबरपर्यंत थंडी टिकून राहण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांत 'फेंगल' चक्रीवादळाने थंडी गायब झाली होती . मात्र आता पुन्हा उत्तर भारतात मार्गस्थ होत असलेले पश्चिमी वारे आणि समुद्र सपाटीपासून साडेबारा किमी उंचीवर वाहणारे उच्च वेगवान पश्चिमी वाऱ्यांच्या झोतामुळे थंडीत होणारं वाढ होणार आहे.



गेल्या आठवडाभरात बंगालच्या उपसागरावर आलेल्या फेंगल चक्रीवादळामुळे जिल्ह्यातील थंडी गायब झाली होती. मात्र, आता फेंगल चक्रीवादळाचा प्रभाव पूर्णपणे कमी झाल्यामुळे जिल्ह्यासह राज्यात निर्माण झालेले ढगाळ वातावरण कमी होऊन, कोरडे हवामान निर्माण झाले आहे. त्यामुळे थंडीच्या प्रमाणात वाढ होणार आहे.

## आरआर आबांची आठवण, रोहित पाटलांनी विधानसभेत केले पहिले दमदार भाषण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावून नवनिर्वाचित आमदारांना शपथबद्ध करण्यात आले. पहिल्याच दिवशी मविआने विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करत शपथविधीवर बहिष्कार टाकला. परंतु, त्यानंतर दुसऱ्या दिवशी महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांनी शपथ घेतली. राहुल नार्वेकरांनी अध्यक्षपदासाठी अर्ज भरला.



महाविकास आघाडीकडून कुणीही अध्यक्षपदासाठी अर्ज न भरल्याने नार्वेकर बिनविरोध निवडून आले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अभिनंदनासाठी मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर अनेक सदस्य बोलले. परंतु, आरआर आबांच्या रोहित पाटील यांनी विधानसभेतील आपले पहिलेच भाषण चांगलेच गाजवले.

या देशाचं वेगळेपण टिकून आहे. त्याचे कारण असे आहे की अनेक शाह्या या देशाने पाहिल्या. पण लोकशाही या देशाच्या वाट्याला आली, ज्यामुळे संबंध जगामध्ये आपले देश वेगळेपण टिकवून ठेवू शकले. त्याचे दुसरे कारण संसदीय पद्धत आपण कमावली, त्यामुळे लोकशाहीला वेगळे महत्त्व प्राप्त झाले. त्या एकमताच्या माध्यमातून जो अधिकार आपल्याला मिळाला त्यानुसार सदस्य येथे बसले आहेत. आपल्याला विनंती करेन की सर्वांत तरुण अध्यक्ष होण्याचा मान तुम्ही पटकावला आहे, तसा मी सर्वांत तरुण सदस्य म्हणून मान पटकावला आहे. मंत्रिमंडळाच्या या तरुण सदस्याकडे बारीक लक्ष असेल, अशी विनंती करतो. माझ्याकडे लक्ष असावे याचे कारण मी सुद्धा वकिली पूर्ण करतोय. एक नंबरवरच्या बाकावर असलेल्या वकिलाला जशी तुम्ही मदत करता, तशीच मलाही कराल, असे रोहित पाटील यांनी सांगितले. दरम्यान, संत तुकारामांच्या वाणीतून एक अभंग आला आहे. अमृताहून गोड तुझे नाम देवा, आता संतांच्या वाणीतून आपले नाव गोड पद्धतीने घेतले गेले. पुढच्या काळात काम करत असातना तुम्ही विरोधी पक्षाला गोड पद्धतीची वागणूक द्याल अशी विनंती करतो, असे रोहित पाटील म्हणाले. यानंतर सभागृहातील सदस्यांमध्ये एकच हशा पिकला. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्याला प्रतिसाद दिला. पुढे बोलताना, अमृताहूनी मुद्दाम म्हणालो. पुराणांमध्ये अमृताला वेगळे महत्त्व आहे. आजही आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मी विनंती करेन की विरोधी पक्षालाही सहकार्य कराल, अशी मिश्लिक टिपण्णी रोहित पाटील यांनी केली.

## कधीतरी लक्षात घ्या की तुमचा करेक्ट कार्यक्रम झालाय; अजित पवारांनी विरोधकांना सुनावलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

विधानसभेचे अध्यक्ष म्हणून राहुल नार्वेकर यांची पुन्हा एकदा निवड करण्यात आली आहे. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी राहुल नार्वेकर यांचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिनंदन केले. तसेच बोलताना मारकडवाडीतील घटनेवरूनही अजित पवार यांनी भाष्य केलं. मारकडवाडीमध्ये बॅलेट पेपरमध्ये मतदान घेण्यावरुन महाविकास आघाडीने सत्ताधाऱ्यांवर टीका केली होती. शरद पवार यांनीही मारकडवाडीला भेट देत ईव्हीएमबाबत शंका उपस्थित केली. त्यावरुन बोलताना तुम्हाला जनतेने नाकारलेलं आहे. आमची बाजू खरी आहे, असं अजित पवार यांनी म्हटलं.

विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमच्या वापराला विरोध करत सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी



ग्रामस्थांनी मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची तयारी केली होती. निवडणुकीत ईव्हीएमवर शंका घेत माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर यांच्या गटाने बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी प्रशासनाकडे केली. मात्र ही मतदान प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत नसल्याचा निर्वाळा प्रशासनाने दिला. त्यानंतर उत्तमराव जानकर यांनी ही निवडणूक प्रक्रिया रद्द केली. त्यामुळे शरद पवार यांनी मारकडवाडीत जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधला होता. त्याचे पडसाद विधानसभेत उमटले आहेत. उगीच काहीतरी स्टंटबाजी केली जात असल्याचे अजित पवार यांनी म्हटलं आहे.

निवडणुकीच्या काळात अनेकजण स्टेजवर संविधान हातात घ्यायचे. संविधान हातात घेतलं तरच संविधानाबद्दल आदर वाटतो का तर असं नाही. एकनाथ शिंदे म्हणाले की ते कोरं होतं. संविधानाच्या तरतुदी त्यांनी वाचलेल्या नाहीत असं माझं मत आहे. किंवा वाचून ते त्याचे उल्लंघन करत आहेत असं म्हणावं लागेल. संविधानाच्या अनुच्छेद १८८ मधील तरतुदीनुसार प्रत्येक निवडून आलेल्या सदस्याने त्यांचे स्थान ग्रहण करण्यापूर्वी शपथ घेणे आवश्यक आहे. शपथेवर बहिष्कार म्हणजे या तरतुदीचा सरळसरळ भंग आहे. जरा कळ काढल्यानंतर शपथ घेण्यात आल्या, असं अजित पवार यांनी म्हटलं.

मारकडवाडीकरता आम्हालाही आपलेपणा आणि प्रेम आहे. पण कारण नसताना एक असा बाऊ केला जातोय. कधीतरी लक्षात घ्या की आपला करेक्ट कार्यक्रम झालेला आहे. तुम्हाला जनतेने नाकारलेलं आहे. आमची बाजू खरी आहे, असंही अजित पवार म्हणाले.

## माझ्या मताधिक्याची टिंगल उडवली जातेय; नाना पटोले विधानसभेत का संतापले?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

मी जे निवडून आलोय, त्याबद्दल टिंगल... तुम्हाला आता नंबर द्यावे लागतील उपमुख्यमंत्र्यांना भविष्यात. एक नंबरचा उपमुख्यमंत्री आणि दोन नंबरचा उपमुख्यमंत्री. मला मिळालेल्या २०८ मताधिक्याबद्दलची टिंगल याठिकाणी उडवली जातेय, असे म्हणत नाना पटोले यांनी संताप व्यक्त केला. विधानसभा अध्यक्षांच्या निवडीनंतर झालेल्या भाषणादरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पटोलेंच्या मताधिक्याचा उल्लेख करत टोला लगावला.

विधानसभेत बोलताना नाना पटोले म्हणाले, खरंतर इथे निवडून आलेलाच माणूस येऊ शकतो. किती मतांनी आला त्याची गिनती नाही. सुरूवातीलाच त्याची आकडेवारी असते. मी आणि देवेंद्रजी, पहिल्यांदा जेव्हा इथे आलो २००४ मध्ये सर्वाधिक मताधिक्याने आलो होतो.



त्यानंतर झालेल्या निवडणुकीत मी सर्वाधिक मताधिक्य घेऊन आलो होतो. त्यामुळे इथे काही बक्षीस मिळतं असा चर्चेचा विषय होऊ शकत नाही.

लोकांनी मतदान केलं आहे. त्या मतदानाच्या आधारावरच या सभागृहात मी आलेलो आहे. त्याबद्दलची टिंगल याठिकाणी केली जातेय. जनतेच्या मतांवरच हास्यकल्लोळ करायचा असेल, तर हे काही बरोबर नाही, अशा शब्दात नाना पटोलेंनी नाराजी व्यक्त केली.

**एकनाथ शिंदे काय बोलले?**

गेल्यावेळी तुम्ही म्हणाला होतात की, डाव्या बाजूची जास्त काळजी घ्या. जनतेनेच डाव्या बाजूची जास्त काळजी घेतलेली आहे. खरं म्हणजे जयंतराव आहेत, तर आता मज्जा आहे. बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज बाबा सभागृहाच्या बाहेर गेले. नाना वाचले २०८. ईव्हीएममध्ये घोटाळा असता तर तुम्ही वाचले नसते, असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला.

**अजित पवारांनीही पटोलेंना लगावला टोला**

अजित पवार विधानसभेत बोलत असताना नाना पटोलेंनी गुलाबी जॅकेटबद्दल विचारलं. त्यावर अजित पवार म्हणाले, गुलाबी जॅकेट आज मुख्यमंत्र्यांना दिले आहे. २०८ वाले आता रंगही विसरायला लागले आहेत. मला शिंदेंनी सांगितलं २०८, असे म्हणत अजित पवारांनी पटोलेंना डिवचलं.

## चित्रा वाघ यांनी राऊतांचे मानसिक संतुलन काढले म्हणाल्या, त्यांच्या डोक्यावर परिणाम झालाय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना चांगलीच चर्चेत आली आहे. दरम्यान आता राज्यात महायुतीचं सरकार पुन्हा स्थापन झाल्यानंतर विरोधकांनी मात्र या योजनेवर टीका सुरू केलीय. दरम्यान आता लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा रेकॉर्ड तपासला जाणार असल्याचं वृत्त समोर आलंय.

लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांनी मात्र निवडणूक झाल्यानंतर सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. १५०० रुपयांना मतं विकत घेतली, आता बहिणींचे दिलेले पैसे परत घेऊ नका अशी टीका संजय राऊत यांनी केलाय. यावरून मात्र भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी संजय राऊतांवर हल्लाबोल केलाय.माध्यमांशी बोलताना चित्रा वाघ म्हणाल्या की, संजय राऊत यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. काही पुरुषांनी फॉर्म भरून पैसे घेतले आहे. ५ महिन्यांत पुरुषांनी किंवा डुप्लिकेट फॉर्म समोर येत आहे. संजय राऊतांना ही लाडकी बहीण योजना बंद करायची आहे, पण आम्ही होऊ देणार नाही.

## संपादकीय ......

# सुसंस्कारी राजकारणाचे पुनर्भरण

देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला आहे. बाविसाव्या वर्षी नागपूर महानगरपालिकेत प्रवेश करणारे देवेंद्र महाराष्ट्रातलेच नव्हे तर भारतातले दुसरे सर्वात तरुण महापौर होते. पुढे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष, मुख्यमंत्री आणि आता पुन्हा एकदा त्याच पदी विराजमान होऊन त्यांनी आपल्या वाटचालीतील एक वर्तुळ पूर्ण केले आहे. या सगळ्यात त्यांच्या अंगीचे काही गुण विशेषत्वाने नोंद घेण्याजोगे आहेत

देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळ नेतेपदी निवड झाली, ते विधिमंडळातील भाजपाचे नेते झाले आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचे अधिकृत उमेदवारही झाले. देवेंद्र मुख्यमंत्री होण्यामागे बरेच संदर्भ आहेत. या संदर्भातील पहिली गोष्ट म्हणजे गेल्या दहा-बारा वर्षांमध्येच नव्हे तर २५-३० वर्षांपासून जातीय विषाणूंनी महाराष्ट्रातील सामाजिक जीवन गढूळ करण्याचे खूप मोठे कारस्थान झाले. दुर्दैवाने ते यशस्वीही झाले. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण सभ्य-सुसंस्कृत होतेच, पण इथे फार पूर्वीचा पण मनावर चरा ओढून गेल्यामुळे अगदी ताजा राहिलेला एक प्रसंग आठवतो. त्यावेळी पंढरपूर नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून एका गांधीवादी, खादीधारी, जीवनभर व्रतधारी असणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्याने यशवंतरावांना तात्याराव गुर्जर यांचे नाव सुचवले. ते ऐकून तिथे यशवंतराव काही बोलले नाहीत, पण बैठक पार पडल्यानंतर त्या गांधीवादी कार्यकर्त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, 'कोणाचे नाव सुचवायचे असते, हे कळते का तुम्हाला?'असो. शरद पवारांच्या कारकिर्दीत राज्यात जातीय द्वेष उफाळून आला. 'पुणेरी पगडी'चा होणारा उल्लेख असो वा त्यांच्या जातीकडे निर्देश करणारी विखारी टीकाटिप्पणी करणे असो. असे अनेक प्रसंग समाजाने पाहिले. गेल्या दहा वर्षांमध्ये तर या द्वेषाचा अतिरेक झाला. दु:खाची बाब म्हणजे राजकीय व्यासपीठांवर अगदी भाजपाच्या वक्त्या वा नेत्यांकडूनही जातीपातीचे राजकारण तापवण्याचा प्रयत्न झालेला दिसला. अशा वातावरणात देवेंद्र यांच्यावर अतिशय वैयक्तिक, खालच्या पातळीवर मते व्यक्त होत होती. त्यामुळे संवेदनशील आणि सुसंस्कृत माणसाला प्रगतिशील, शिवरायांचा; शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र कोणत्या पातळीवर जावू लागला आहे, याची चिंता वाटत होती. यात भर घालणारी आणि प्रभावी ठरणारी तामसी प्रवृत्ती माध्यमांच्या रूपाने समोर येत होती. त्यातला आणखी एक पदर यूट्युबर्सचा होता. यापैकी कोणाकडूनही कोणाविषयीच आदरार्थी संबोधन वापरले जात नव्हते. माध्यमांनी वक्त्या-प्रवक्त्यांनी या सगळ्यांचा कडेलोट केला आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात 'भ'ची बाराखडी आणणाऱ्या एका व्यक्तीने राज्याची रोजची सकाळ गलिच्छ करून टाकली. मधल्या काळात आरक्षणाच्या निमित्ताने वातावरण आणखी ढवळून निघाले.

या सगळ्या पार्श्वभूमीवर राज्याची सूत्रे देवेंद्र गंगाधरपंत फडणवीस यांच्या हातात पुन्हा आली आहेत. ही महाराष्ट्रासाठी, इथल्या सुसंस्कृत लोकांसाठी, राष्ट्रीय संतांसाठी, युवक-युवतींसाठी महत्त्वाची बाब आहे, याचा विचार आता व्हायला हवा. हे पाहताना संबोधनातील एक सुखद बदल नक्कीच सांगावासा वाटतो. तो असा की, सगळेजण आधी त्यांना 'देवेंद्रजी' म्हणत होते. पण आता अखिल भारतीय पातळीवर ते 'देवाभाऊ' झाले आहेत. संघाचा स्वयंसेवक, विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता, घरातील जनसंघ-भाजपाची परंपरा पाळणारा मुलगा आणि पक्षात आल्यानंतर बुथ लेव्हलपासून काम सुरू करणारा एक तळमळीचा माणूस हा सगळा प्रवास त्यांच्या वाटचालीला वळण देणारा आहे. यातील निरागसता लोकांना भावते. ही निरागसता राजकारणात वावरताना त्यांच्यासाठी एक ढालसुद्धा झाले. बाविसाव्या वर्षी नागपूर महानगरपालिकेत प्रवेश करणारे देवेंद्र महाराष्ट्रातलेच नव्हे, तर भारतातले सर्वात तरुण दुसरे महापौरही झाले. पुढे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष, मुख्यमंत्री आणि आता पुन्हा एकदा त्याच पदी विराजमान होऊन त्यांनी आपल्या वाटचालीतील एक वर्तुळ पूर्ण केले. देवेंद्र कोणाच्या 'गुड बुक्स'मध्ये असल्याने मुख्यमंत्री झालेले नाहीत. मोदींच्या कृपेमुळे, अमित शहांच्या लोभामुळे, वरिष्ठांच्या वरदहस्तामुळे त्यांना हे पद मिळाले नसून स्वत:ला सिद्ध करून त्यांनी ते मिळवले आहे. हा ध्येयाचे सतत स्मरण ठेवणारा राजकारणी आहे.

अलीकडच्या काळात राजकीय नेत्यांमध्ये क्वचितच दिसणारी पण देवेंद्र यांच्यामध्ये आढळणारी एक बाब म्हणजे वैचारिक स्पष्टता. यंदा भाजपाने गाठलेला १३२ चा आकडा खूप मोठा असून यात त्यांचेही मोठे यश आहे. मुख्यमंत्रीपद मिळाल्यानंतर त्यांनी केलेले भाषण आपण ऐकले. इथे वैचारिक स्पष्टता सिद्ध करणारे त्यांचे एक वाक्य लक्षात घेण्याजोगे वाटते. युतीधर्म असताना चार गोष्टी मनासारख्या होतात, तर चार गोष्टी होत नाहीत. त्यामुळेच त्या पोटात घेऊन पुढे जाता आले पाहिजे असे सांगत ते पुढे म्हणाले की, सत्ता टिकून राहण्यासाठी हे करायचे नसते तर एक मोठे ध्येय गाठण्यासाठी हे करणे गरजेचे ठरते. हिंदुत्वाचा विरोध करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना सार्वजनिक जीवनातून रोखायचे असेल तर खरा कार्यकर्ता आणि सच्चा हिंदुत्ववादी शिवसैनिक यांना सन्मानाने बाहेर काढले पाहिजे, हे त्यांनी ओळखले होते. दुसरीकडे स्वार्थ, जातीपाती, नातीगोती, परिवारवादाचे राजकारण करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील एक गट बाहेर काढण्याचे महत्त्वही त्यांनी जाणले होते. म्हणूनच धूर्तपणे निर्णय घेत त्यांनी हे काम केले.संसदपटू म्हणूनही ते मोठे आहेत. त्यांना यासंबंधीचे पुरस्कारही मिळाले आहेत. खरे तर त्यांना पाहून मला रामभाऊंचीच (म्हाळगी) आठवण येते. देवेंद्र हे प्रमाण असल्याखेरीज कोणताही प्रहार करत नाहीत, हे अत्यंत महत्त्वाचे. या सगळ्या गुणांमुळेच त्यांच्यामध्ये एक आत्मविश्वास दिसतो. आता आत्मविश्वासाने परिपूर्ण असणारा आणि समोरच्याला जशास तसे पण सभ्यतेचे संकेत न मोडता उत्तर देणारा लोकांच्या मनातील असा नेता मुख्यमंत्रीपदी विराजमान झाला आहे. शरद पवारांचा दबदबा संपवणारे हे नाव आता नव्याने सत्तेच्या केंद्रस्थानी आले आहे. त्यामुळेच त्यांच्या या नव्या कार्यकाळात विकास, विकासशील उपक्रम-योजना आणि सामाजिक समतेविषयीचा प्रामाणिक आग्रह बघायला मिळेल तसेच त्यांची राजवट संस्मरणीय होईल यात शंका नाही.

# असे करा, लसूण पिकावरील करपा आणि फुलकिडीचे नियंत्रण




कृषी विशेष

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**

लसूण उत्पादनावर परिणाम करणाऱ्या अनेक घटकांपैकी रोग व किडींचा उपद्रव का प्रमुख घटक आहे. आजच्या लेखातून लसूण पिकावरील कीड आणि रोगांचे नियंत्रण कसे करावे, हे जाणून घेऊया...!

**करप्याचा प्रादुर्भाव झाल्यास...**

लसुणावर प्रामुख्याने करप्याचा प्रादुर्भाव आढळून येतो.

पिवळसर तपकिरी रंगाचे लांबट चट्टे पानावर बाहेरील भागावर दिसू लागतात.

चट्टयांचा आकार वाढत जाऊन पाने सुकु लागतात.

१५ ते २० सेंटीग्रेड तापमान व ८०-९० टक्के आर्द्रता यामुळे बुरशीची वाढ झपाटयाने होते.

फेब्रुवारी मार्च महिन्यात पाऊस झाला किंवा ढगाळ वातावरण असल्यास या रोगास फारच पोषक ठरते.

**फुलकिडीचा प्रादुर्भाव झाल्यास...**

लसुण पिकावर फुलकिडीचा प्रादुर्भाव आढळून येतो. ही कीड आकाराने लहान असते.

त्याचा रंग पिवळसर तपकिरी असतो व त्याच्या शरीरावर फुलीच्या आकाराचे गडद चट्टे असतात.

या किडीचे पिले व प्रौढ कीटक पानातील रस शोषून घेतात.

किडींनी असंख्य चावे घेतल्यामुळे पानांवर पांढरे ठिपके पडतात.

असंख्य ठिपके जोडले गेल्यामुळे पाने वाकडी होतात व वाळतात.

**करता येणाऱ्या उपाययोजना**

फुलकिडे यांनी केलेल्या जखमांमधुन करपा रोगाच्या बुरशीस सहज शिरकाव करता येतो. जेव्हा जेव्हा फुलकिड्यांचा प्रादुर्भाव होतो. तेव्हा रोगाचे प्रमाण देखिल वाढते. कोरडी हवा आणि २५ ते ३० सेंटीग्रेड तापमानात या किडीचे प्रमाण जास्त असते व असे हवामान फेब्रुवारी ते एप्रिल महिन्यात उपलब्ध असते. वेळीच नियंत्रण न केल्यास मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

करपा व फुलकिडी यांच्या एकत्रित रोग व किड नियंत्रणासाठी लक्षणे दिसताच १५ दिवसाच्या अंतराने चार फवारण्या मॅन्कोझेब (०. ३%) किंवा कार्बेन्डॅझिम (०.१%) हे बुरशीनाशक व डायमेथोएट ३० ईसी १२ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २० मिली प्रती १० लिटर प्रमाणे कीटकनाशकाच्या आलटुन पालटून फवारण्या कराव्यात, फवारणी करतांना चिकट द्रवाचा (०.१%) वापर जरुर करावा.

**- डॉ. राकेश सोनवणे,**
**डॉ. रवींद्र पाटील**
कांदा व द्राक्ष संशोधन केंद्र, निफाड, जि. नाशिक

# जमिनीचे जुने फेरफार, सातबारे, खाते उतारे पहा मोबाईलवर

## अशी आहे संपूर्ण प्रक्रिया




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती-** जमिनीचे जुने फेरफार, जुने सातबारे,खाते उतारे हे आपल्या मोबाईलवर पाहता येतात. जमिनीची जुनी कागदपत्र ही खराब किंवा गहाळ होत चालल्याने शासनाने ऑनलाईन पद्धतीने कागदपत्र उपलब्ध करून दिली आहेत. तुम्ही तुमच्या मोबाईलवर देखील पाहू शकता, जाणून घेऊया या संपूर्ण प्रक्रियेबद्दल...

**अशी आहे संपूर्ण प्रक्रिया** - सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाच्या आपले भूलेख किंवा थेट https://aapleabhilekh .mahabhumi .gov.in/erecords या वेबसाईटवर जायच आहे.

यानंतर दोन ऑप्शन दिसतील एक तर लॉगिन करायचा आहे किंवा लॉगिन नसल्यास नव्याने नोंदणी करायची आहे.

नव्याने नोंदणी करण्यासाठी न्यू युजर रजिस्ट्रेशन यावर क्लिक करा.

यात आपलं नाव, मोबाईल नंबर, ईमेल आयडी, जन्मतारीख, पत्ता, पिन कोड, तालुका, जिल्हा इत्यादी माहिती भरावी.

यानंतर पासवर्ड क्रिएट करून सबमिट करायचा आहे. आपली नोंदणी होईल.

पुढे User Id Password ने लॉगिन करायचे आहे.

लॉगिन केल्यानंतर रेगुलर सर्च यावर क्लिक करायचा आहे.

यानंतर आपल्यासमोर नवीन विंडो ओपन होईल. यात कार्यालय, जिल्हा, तालुका, गाव, दस्ताऐवज आणि व्हॅल्यू अशा पद्धतीचे रकाने दिसतील.

ज्या कार्यालयाच्या अंतर्गत आपल्याला कागदपत्र पाहिजे आहेत. ते कार्यालय निवडायचे आहे.

त्यानंतर जिल्हा निवड, तालुका निवड, गाव निवड, यानंतर कोणता कागद पत्रे हवे आहेत, ते निवडा.

(आता यात महत्त्वाचा मुद्दा असा की, त्या गावाची जेवढी कागदपत्र उपलब्ध असतील, तेवढेच कागदपत्र दाखवली जातील आणि उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहायला मिळणार आहेत.)

त्यानंतर आपल्याला सर्वे नंबर टाकायचा आहे. त्यानंतर सर्च बटनावर क्लिक करायचा आहे. सर्च केल्यानंतर त्या संबंधित कागदपत्र आपल्यासमोर दिसेल. अशा पद्धतीने तुम्हाला संबंधित गावाबाबत जे कागदपत्र उपलब्ध असेल ते पाहता येणार आहे.

# एकीकडे बनावट तर दुसरीकडे खतांची लिंकिंगद्वारे होतेय विक्री




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती -** रब्बीच्या हंगामाला राज्यभरात सुरुवात झाली आहे विविध कंपन्यांकडून सगळ्याच खतांवर सर्रासपणे लिंकिंग पद्धत वापरली जात आहे त्यामुळे ऐन रब्बी हंगामात शेतकऱ्यांना याचा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

अमरावती जिल्ह्यात रब्बी हंगामात हजारो मेट्रिक टन विविध रासायनिक खतांची गरज लागते. यंदा मात्र पावसाने तारल्याने रब्बी हंगाम चांगला जाणार या हेतूने खत कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर खतांसोबत लिंकिंग सुरु केली आहे.जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर खतांचा काळाबाजार सुरू असून कृषी विभाग खत कंपन्यांवर कारवाई करताना दिसत नाही. कंपन्यांच्या दबावापोटी कृषी सेवा केंद्र चालकांनाही इच्छा नसताना नाईलाजाने लिंकिंग खते शेतकऱ्यांच्या माथी मारावी लागत आहेत.खरीप हंगामापेक्षा रब्बी हंगामात अधिक प्रमाणात खतांची गरज भासत असते. या हंगामात ऊस, गहू, कांदा आदी पिकांना मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांची गरज लागते. त्याचाच फायदा या खत कंपन्या उचलीत असल्याचे दिसत आहे.एकीकडे मजुरीचे, बियाण्यांचे दर भरमसाठ वाढलेले असताना दुसरीकडे लिंकिंग आणि दरवाढीचाही फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

### लिंकिंगशिवाय खतच मिळत नाही

एका कृषी सेवा केंद्र चालकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, बहुतांश सगळ्याच खत कंपन्या तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालकांना लिंकिंगशिवाय खत पुरवठा करत नाहीत. लिंकिंग प्रकार मान्य करूनही अॅडव्हान्स पेमेंट घेतल्यानंतरच कृषी सेवा केंद्रांना खताचा पुरवठा केला जातो. लिंकिंगशिवाय कोणतेच खत मिळत नसल्याने नाईलाजाने आम्हालाही शेतकयांना लिंकिंगची खते विकावी लागतात, असे एका कृषी सेवा केंद्र चालकाने सांगितले.

दरात पाच ते दहा टक्क्यांची वाढ

गेल्या महिन्यात खतांच्या किमतीत पाच ते दहा टक्क्यांची वाढ झाली. खताच्या प्रत्येक प्रत्येक गोणीमागे पन्नास ते शंभर रुपायांची वाढ करण्यात आली आहे. याचाही शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागणार आहे.

### कोणत्या खतांवर कशाची होतेय लिंकिंग

विविध कंपन्यांचे युरिया, डीएपी, संयुक्त खते, मिश्र खते, पोटॅश, सिंगल सुपर फॉस्फेट आदी प्रमुख खतांवर नॅनो युरिया, नॅनो डीएपी, १९:१९:१९, सूक्ष्म अन्नद्रव्ये, पीडियम पोटॅश, गंधक, सल्फर आदींसह औषधे लिंकिंग होत आहे.




# गुळ का खाल्ला पाहिजे? काय आहेत गुळाचे फायदे; वाचा सविस्तर




**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**

साखरेचा वापर वाढल्याने आरोग्याचे प्रश्न गंभीर बनले असून, आपल्या आहारातून साखर काढून टाकण्यासाठी एक प्रभावी उपाय म्हणजे गूळ.

आवड म्हणून साखर खाणे ठीक आहे, पण गरज म्हणून गुळाचा वापर वाढला तर जीवन आरोग्यदायी राहण्यास मदत होते. पण दुर्दैवाने गुळाचं मोठे उत्पादन होत असताना देखील आपल्या चहातून गूळ गायब झाला आहे.साखर ही शरीराला हानिकारकच आहे, अनेक आजारांचे मूळ हे साखरेतच दडले आहे. तरीही आपण साखर खाणे सोडत नाही. विशेष म्हणजे 'कोल्हापुरी गुळा'ने जगाला भुरळ घातली आहे.पण येथील नागरिक त्याचा वापर फार कमी प्रमाणात करतात. साखरेच्या चहा ऐवजी गुळाचा चहा रोज घेतला तर तो आरोग्याच्यादृष्टीने अधिक फायदेशीर ठरतो. अलीकडे आहारातील गुळाचा वापर खूप कमी झाला आहे.ग्रामीण भागही त्याला अपवाद राहिलेला नाही. वर्षातून सणाला केल्या जाणाऱ्या पुरणपोळीमध्ये एवढाच काय तो गुळाचा वापर राहिला आहे. शहरात काही ठिकाणी तर पुरणपोळीत गुळाऐवजी साखरेचाच वापर केला जातो.पूर्वी पाहुणा घरी आला की चहा, सरबत ऐवजी गूळ शेंगा दिल्या जायच्या. आरोग्य सुदृढ ठेवायचे झाल्यास आपल्या रोजच्या जीवनात साखरेचे प्रमाण कमी करून गुळाचा सहभाग वाढविण्याची गरज आहे.

**गूळ हृदयरोगासाठी एकदम उपयुक्त**

- हृदयाच्या आरोग्यासाठी गुळाचे सेवन करणे फायदेशीर ठरू शकते.
- अत्यावश्यक जीवनसत्त्वे, खनिजे तसेच अँटिऑक्सिडंट्सच्या चांगुलपणाने भरलेले हे नैसर्गिक स्वीटनर आहे.
- गुळ रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते.
- गुळ दाहक-विरोधीदेखील आहे आणि रक्ताभिसरण वाढविण्यात मदत करतो.
- सकाळी रिकाम्या पोटी गूळ खाल्ल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, ज्यामुळे शरीराची आजारांशी लढण्याची क्षमता वाढते.
- गुळामध्ये व्हिटॅमिन सी, बी ६ आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. तसेच, यात अँटीऑक्सिडंट गुणधर्म भरपूर प्रमाणात असतात.
- विशेषत: शेतात काम करणाऱ्या महिलांनी रक्त वृद्धीसाठी गुळ खाणे फायदेशीर आहे.

# वस्तू व सेवा कर अभय योजनेत व्याज व दंडाची संपूर्ण माफी

**राज्यकर सहआयुक्त श्री संजय पोखरकर जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अकोला,**

वस्तू व सेवा कर अभय योजना २०२४ ही वस्तू व सेवा कर कायद्याअंतर्गत निर्धारणा आदेश पारित करण्यात आलेल्या व्यापाऱ्यांनी थकीत मुळ करांचा भरणा केला,तर त्यांना त्या करावरील व्याज आणि विलंब आकाराची संपूर्ण माफी देणारी असल्याने ,जिल्ह्यातील जास्तीत जास्त व्यापाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याची आवाहन राज्यकर सहआयुक्त संजय पोखरकर यांनी केले.

अकोला राज्य व वस्तू सेवा कार्यालय आणि सी.ए.असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला आय.सी.ए.आय.भवन येथे वस्तू व सेवा कर अभय योजना २०२४ संबंधीत आयोजित परिसंवादात ते बोलत होते. यावेळी वस्तू व सेवा कर उपायुक्त डॉ.अर्चना चव्हाण, अध्यक्ष आयसीएआय सुमित अलीलचंदानी,सिमा बाहेती आणि रितेश मेहता यांच्या प्रमुख उपस्थितीसह अकोला राज्य वस्तू व सेवा कर कार्यालयातील अधिकारी,कर्मचारी आणि आय.सि.ए.आय. चे सदस्य उपस्थित होते.

परिसंवादात बोलतांना सहायक राज्यकर आयुक्त प्रविण भोपळे यांनी अभय योजनेच्या तरतूदी आणि प्रक्रीया बाबत माहिती दिली.

**अभय योजना आणि योजनेचे फायदे**

१.जुलै २०१७ ते मार्च २०२० या कालावधीत पारित निर्धारणा आदेशांचा समावेश

२. मुळ कराची रक्कम भरली,तर व्याज व विलंब आकाराची संपूर्ण माफी

३. योजनेअंतर्गत ३१ मार्च २०२५ च्या आधी थकीत कराची रक्कम भरणे आवश्यक

तसेच रितेश मेहता यांनी सविस्तर मार्गदर्शन कायदेशीर तरतूदीबाबत केले.परिसंवादाच्या यशस्वीतेसाठी तुषार लांडगे,सचिन लव्हाळे,चुडे आणि निवृत्ती राऊतांनी यांनी प्रयत्न केले ३१ मार्च २०२५ पर्यंतच थकीत कराचा भरणा करणे या अभय योजनेत बंधनकारक आहे. ही योजना वर्ष २०१७-१८, २०१८ -१९ आणि २०१९- २० या कालावधीमध्ये कराचा भरणा न झालेल्या आणि निर्धारणा आदेश पारित झालेल्यांना लागू राहणार आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ९ डिसेंबर २०२४ | शहर/ग्रामिण


# इव्हीएमवर शंका असेल, तर अमरावतीच्या खासदारांनी राजीनामा द्यावा, आमदार रवी राणा देखील राजीनामा देतील

## माजी खासदार नवनीत राणा यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांनाच दिले आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि९अमरावती, –** मतदानयंत्राद्वारे मतदानात गैरप्रकार झाल्याचा आरोप करत तसेच मतपत्रिकेच्या माध्यमातूनच निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीने आंदोलन छेडले आहे भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांनाच आव्हान दिले आहे.नवनीत राणा म्हणाल्या, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर मतदान यंत्रांवर आक्षेप घेतला नाही. मात्र आता ते उगाच आरोप करीत सुटले आहेत. त्यांना जर इव्हीएमवर शंका असेल, तर अमरावतीचे काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे यांनी आधी राजीनामा द्यावा. त्यासोबतच बडनेराचे आमदार रवी राणा हे देखील राजीनामा देतील.मग, ही निवडणूक मतपत्रिकेच्या माध्यमातून घ्यावी. मला तर महाविकास आघाडीच्या नेत्यांची कमाल वाटते. लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला महाराष्ट्रात चांगले यश मिळाले, त्यावेळी त्यांनी इव्हीएमवर शंका उपस्थित केली नाही. त्यावेळी इव्हीएम बरोबर होते तेव्हा लोकशाही जिवंत होती, असा टोला नवनीत राणा यांनी लगावला.नवनीत राणा म्हणाल्या, आम्ही संविधानाला मानणारे लोक आहोत. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर त्यावर आक्षेप घेण्यासाठी आम्ही कुणीही बाहेर आलो नाही. आता जर त्यांना इव्हीएमवर शंका असेल, तर अमरावतीच्या खासदारांनी राजीनामा द्यावा, बडनेरा मतदार संघाचे आमदार रवी राणा देखील राजीनामा देतील, त्यावेळी मतपत्रिकेवर मतदान एकदा होऊन जाऊ द्या, असे आव्हान नवनीत राणा यांनी विरोधकांना दिले.विधानसभा



निवडणुकीच्या निकालानंतर विरोधी पक्षाकडून मतदान यंत्राविषयी संशय व्यक्त केला जात असून या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी आंदोलन केले जात आहे. त्यावर भाष्य करताना नवनीत राणा यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांची खिल्ली उडवली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर सर्वकाही बरोबर होते. त्यावेळी लोकशाही जिवंत होती आणि आता विरोधात निकाल आला, म्हणून लोकशाही धोक्यात आली, हा विरोधकांचा दुटप्पीपणा आहे, असे नवनीत राणा म्हणाल्या.


# जिल्ह्यात नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीस प्रतिबंध

## पोलीस आयुक्तांसह ग्रामीण पोलीस अधिक्षांचे आदेश





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि९अमरावती,–** पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी व जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी शुक्रवारी नायलॉन मांजाच्या ऑनलाइन खरेदी-विक्रीस प्रतिबंध घालणारा आदेश काढला असून आदेश अमरावतीसह जिल्ह्यात ६ डिसेंबरच्या रात्रीपासून तर ३१ जानेवारी २०२५ च्या रात्री १२ पर्यंत लागू राहणार आहे. याबाबत अमरावतीकरांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



१४ जानेवारी रोजी मकर संक्रांत सण असून, या दरम्यान शहरासह जिल्ह्यातील नागरिकमोठ्या प्रमाणावर पतंग उडवून सण साजरा करतात. या सणाच्या निमित्ताने शहरासह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नायलॉन मांजाचीखरेदी-विक्री केली जाते.त्याअनुषंगाने मनाई आदेश काढण्यात आला असून आदेशानुसार, नायलॉन मांजाऑनलाइन पद्धतीने किंवा कुरिअरद्वारे खरेदी किंवा विक्री व पुरवठा करताना तसेच जवळ बाळगताना आढळल्यास संबंधितांविरुद्ध पोलीस विभागामार्फत कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.नायलॉन मांजा हा नायलॉन धाग्यापासून तयार करण्यात येत असून, त्यावर रासायनिक प्रक्रिया करून अत्यंत मजबूत बनविला जातो. त्यामुळे नायलॉन मांजा सहसा तुटत नाही व काही वर्षे तसाच टिकून राहतो. नायलॉन मांजाच्या वापरामुळे शहरातील बऱ्याच नागरिकांना गंभीर स्वरूपाच्या जखमा होतात. जसे गळा कापणे, चेहरा विद्रूप होणे, नाक, कान व गालावर गंभीर जखमा होणे, दुचाकी वाहन चालकांचा नायलॉन मांजात अडकून गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशाप्रकारे नायलॉन मांजा नागरिकांच्या जीविताला व आरोग्याला धोका निर्माण करतो. त्याचप्रकारे नायलॉन मांजा रस्त्यावर, झाडावर, खांबावर, तसाच अडकून राहतो. त्यामुळे पर्यावरणास धोका संभवतो.

# बहुजनाचे घटक गुरव समाजाच्या उत्थानासाठी भाजपचा नेहमी पुढाकार-डॉ. अनिल बोंडे

## श्री शैव गुरव हितकारिणी मंडळातर्फे आत्मियतेने सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि९अमरावती,** बहुजनाचे घटक गुरव समाजाच्या उत्थानासाठी भाजपचा नेहमी पुढाकार असतो आणि पुढे देखील राहणार आहे. अशी ग्वाही देत राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे यांनी श्री शैव गुरव हितकारिणी मंडळातर्फे सत्कार स्वीकारला. अमरावती जिल्ह्याचा इतिहासात प्रथमच भाजपने एवढी मोठी मुसंडी मारत सर्वाधिक पांच जागांवर विजय मिळविला. तसेच भाजपच्या नेतृत्वात महायुतीने अमरावती जिल्ह्यात एकूण सात जागांवर विजय संपादित केला आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ अनिल बोंडे यांच्या



नेतृत्वात एवढ्या मोठ्या संख्येने विजय संपादन केल्याबद्दल श्री शैव गुरव हितकारिणी मंडळातर्फे शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन हा आत्मिय सत्कार करण्यात आला. श्री शैव गुरव हिकाकारिणी मंडळाचे अध्यक्ष शरदराव देवरणकर यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी संपन्न या सोहळ्यात सचिव दिलीप बेलबागकर, त्रिदीप वानखडे, कोषाध्यक्ष जयंत पुसदकर, दिनकरराव अंबुलकर, गोपाळराव चिखलकर,दिपकराव पिंजरकर, मुकुंदराव पुसदकर,नितीन तायडे, राजेश पुसदकर, डॉ बाळापुर ,सुशीलकुमार कथळकर,महेश कथळकर आणि कार्यकारिणी तील इतर पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकासकामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार होण्यासाठी प्रयत्न करा - विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

## लोणार विकास आराखड्यातील विकासकामांची विभागीय आयुक्तांकडून पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि९अमरावती–** लोणार विकास आराखड्यातील विकासकामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार होण्यासह विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे निर्देश लोणार विकास आराखडा समिती अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांना दिले.

लोणार विकास आराखड्यांतर्गत असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी व कामांच्या प्रगतीचा आढावा डॉ. पाण्डेय यांनी शनिवारी (ता.७ डिसेंबर) लोणार येथे घेतला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, समितीचे सदस्य तथा न्यायालयीन मित्र ड. एस. सान्याल, ड. दिपक ठाकरे, ड. कप्तान, ड. परचुरे, भारतीय पुरातत्व विभागाचे अधीक्षक अरुण मलीक, विशेष कार्य अधिकारी सुशील आग्रेकर, वनविभाग, नगरपरिषद, एमएमआरडीएचे अधिकारी, उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

श्रीमती पाण्डेय म्हणाल्या की, बुलडाणा जिल्ह्यातील बेसॉल्ट खडकात उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर हे जगविख्यात आहे. हे स्थळ जैवविविधतेने सपन्न असून पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. लोणार सरोवराच्या जतन, संवर्धन व विकास तसेच परिसराच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाव्दारे ३६९ कोटी ७८ लक्ष रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. विकास आराखड्यातील नियोजि कामे पूर्णत्वास जाण्यासाठी समितीव्दारे नियमितपणे आढावा घेण्यात येतो. आराखड्यांतर्गत येणाऱ्या विविध विकासकामांना प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार आरखड्यातील विकासकामे गतीने पूर्ण होण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. विकास आराखड्यांतर्गत येणारी लोणार सरोवर व परिसरातील नागरी सुविधांची कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करावीत, असे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.प्रत्यक्ष स्थळ पाहणी दरम्यान समिती सदस्यांद्वारे लोणार सरोवर, अन्नछत्र, वेट वेल प्रसाधान गृह, गोमुख परिसर इत्यादी ठिकाणी भेटी देण्यात आल्या. भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या गोमुख परिसरात ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना सुलभरित्या पोहोचणे सोईचे होण्यासाठी रॅम्पची व्यवस्था त्याठिकाणी करण्यात यावी. प्रसाधनगृहाचा योग्यरीत्या वापर होण्यासाठी पाण्याची व्यवस्था नियमित ठेवावी, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी संबंधित यंत्रणांना यावेळी दिले. शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने योग्य ते नियोजन पुढील बैठकीदरम्यान सादर करावे, असेही त्यांनी सांगितले. गोमुख परिसरात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेराची लिंक पोलीस विभागाला देण्यात यावी, जेणेकरून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस विभागाला लक्ष ठेवणे सोयीचे होईल. तसेच पोलीस व भारतीय पुरातत्व विभाग यांनी परिसरात कुठलिही अनुचित घटना घडू नये यादृष्टीने आवश्यक त्या



ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसवावे. यावेळी तारांगण व संग्रहालय स्थापन करण्याकरिता पर्यटन विभागाच्या सादरीकरणाला एकमताने समितीव्दारे मंजूरी देण्यात आलेली आहे. वेडी बाभूळ निष्काशनाबाबत प्रायोगिक तत्त्वावर सर्वेक्षणाच्या आधारे सॅम्पल प्लॉट निवडून नियमानुसार योग्य ती कार्यवाही पूर्ण करावी व तसा अहवाल फेब्रुवारी-२०२५ पर्यंत समितीस सादर करावा, असे निर्देश वनविभागाला देण्यात आले. दरम्यान याप्रसंगी शेगाव विकास आराखड्या बाबतही दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली.

# जुन्या वैमनस्यातून दोन गटात सशस्त्र हल्ला

## ४ जण गंभीर, नांदगाव पेठ येथील शासकीय वसाहत मधील घटना

### दंगा नियंत्रण पथक व पोलीस ताफा तैनात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि९अमरावती नांदगाव पेठ**
जुन्या वैमनस्यातून येथील एका समाजातील तांबे व शिंदे या दोन कुटुंबात रविवारी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान सशस्त्र हल्ला झाला. शाब्दिक वादानंतर एकमेकांवर दगडफेक करून नंतर सशस्त्र हल्ला चढविल्याने घटनेत चार जण गंभीर जखमी झालेत. या घटनेने शासकीय वसाहत परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.घटनास्थळी दंगा नियंत्रण पथक तसेच पोलिसांचा ताफा तैनात करण्यात आला होता. वरिष्ठ पोलीस अधिकारी सुद्धा घटनास्थळी दाखल झाले होते. घटनेची सविस्तर हकीकत अशी की,दादाराव सुभाष शिंदे व मंगेश धर्मा तांबे या दोघांमध्ये जुन्या कारणावरून रविवारी सकाळी वाद झाला.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर दादाराव व रघुनाथ शिंदेने मंगेश व ईश्वर शिवराम तांबे यांच्यावर सशस्त्र हल्ला चढविला. अशातच मंगेश तांबेवर चाकूचे वार करण्यात आले.ही घटना घडताच पसिरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच नांदगावपेठचे ठाणेदार महेंद्र अंभोरे तातडीने आपल्या



ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी चारही जखमी दादाराव सुभाष शिंदे, रघुनाथ



शिंदे, मंगेश धर्मा तांबे, ईश्वर शिवराम तांबे यांना जिल्हा रूग्णालयात दाखल केले.

### दोन्ही कुटुंब एकमेकांचे सगेसोयरे

शासकीय वसाहत परिसरात तांबे व शिंदे परिवार अनेक वर्षांपासून राहतात. दोन्ही गट एकमेकांचे सगे-सोयरे असून यांच्यामध्ये जुन्या कारणावरून अनेक महिन्यांपासून वाद सुरू आहे. नांदगावपेठ पोलिस ठाण्यात दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात तक्रारी दिल्यानंतर त्यांच्यावर परस्परविरोधी तक्रारीहुन अनेक गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. तरी देखील आरोपींमध्ये अधुन-मधुन हिंसा भडकतच असते.अशातच रविवारी पुन्हा या घटनेने डोके वर काढून त्याचे मोठ्या घटनेत रूपांतर झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

परिसरात पुन्हा तनाव निर्माण होऊ नये म्हणून येथे दंगा नियंत्रण पथकासह अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला. डीसीपी गणेश शिंदे, फ्रेजरपुरा विभागाचे एसीपी कैलाश पुंडकर हे देखील घटनास्थळी दाखल झाले. याबाबत दादाराव शिंदे व मंगेश तांबे यांनी परस्परविरोधी तक्रारी दिल्या आहे. वृत्तलिहेस्तोव नांदगावपेठ पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# बंड करणाऱ्यांना आता मातोश्रीची आस का?

## शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि९अमरावती–** विधानसभा निवडणुकीत मातोश्रीचाआदेश धुडकावत आपल्याच पक्षाच्या उमेदवाराला शत्रू मानून बंड करीत निवडणुकीच्या रिंगणात उतरणार्यांना आता मातोश्रीची आस का असा सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केला आहे. पक्षासोबत बंड करीत जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांना आता शिवसेनेत थारा नसल्याचे देखील सुनील खराटे यांनी स्पष्ट केले आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध रिंगणात उतरून अपयशी झालेल्या बंड यांनी आता मातोश्रीवर आपल्याबाबत मंथन सुरू असल्याच्या वावड्या प्रसिद्धी माध्यमातून पसरविण्यास प्रारंभ केला असून पुन्हा एकदा सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न चालविला आहे. याबाबत शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी प्रतिक्रिया देत सदर वृत्त निराधार असून ती केवळ अफवा असल्याचे सांगून बंड करणाऱ्या गद्दारांना शिवसेनेत पर्यायाने मातोश्रीचे दरवाजे बंद झाल्याचे म्हटले आहे. आपण गेल्या पंधरा वर्षापासून शिवसेनेत कुठलेही लाभाचे पद नसताना कार्यरत असून पक्षवाढीसोबतच समाज उपयोगी कार्यक्रम घेत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलने केलीत. याची दखल घेत पक्षप्रमुखांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी दिली. शिवसेनेत आजही सर्वसामान्य कार्यकर्त्याची कदर केल्या जाते हे सिद्ध झाले आणि तशी भावना शिवसैनिकांमध्ये रुजली असे सुनील खराटे यांनी म्हटले आहे. असे असताना एका प्रस्थापित कुटुंबातील सदस्याने बंड केले. ज्या कुटुंबाला तब्बल तीस वर्षे मातोश्रीने उमेदवारी बहाल केली, त्यापैकी पंधरा वर्षे त्यांना पराभव पत्करावा लागला. परिणामी कुठल्याही गोष्टीस काल मर्यादा असते, या नियमाने पक्षप्रमुखांनी काम करणाऱ्या माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला पुढे करून उमेदवारी दिली. परंतु ही बाब पचनी न पडलेल्या कुटुंबाने संधी न मिळाल्याची ओरड करीत कुरघोडी केल्याचा आरोप सुनील खराटे यांनी केला.निवडणूक झाल्यानंतर अपयश पदरी पडल्यावर मात्र हे बंड करणारे आज प्रसिद्धी माध्यमांमधून सहानुभूतीचा बाऊ करीत मातोश्रीवर आपल्या नावावर मंथन होत असल्याच्या वावड्या उडवीत आस लावून बसले आहेत.मातोश्रीचा आदेश धुडकावून बंड करणाऱ्यांना आता मातोश्रीची आस का? असा सवाल सुनील खराटे यांनी करीत संभ्रम निर्माण करण्यासाठी आणि स्वतःचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी हा सर्व खटाटोप असल्याचे खराटे यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे.



### ज्ञानी मामाचे कुटिल राजकारण

ज्या शिवसेनेच्या बळावर दोन वेळा आमदारकी भोगली, त्याच शिवसेनेसोबत गद्दारी करणारे माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांचा ज्ञानी मामा असा नामोल्लेख करीत सुनील खराटे यांनी त्यांच्यावर तोंडसुख घेतले. या मामाचे हे कुटिल राजकारण असल्याचा आरोप देखील खराटे यांनी केला. स्वर्गीय संजय बंड यांच्यावर आकसपूर्ण टीका करीत त्यांचे राजकारण संपविण्याची बाता करणाऱ्या व अत्यंत खालचे विचार मनात बाळगणाऱ्या या ज्ञानी मामाने त्याच बंड घराण्यातील उमेदवाराला निवडणुकीत उभे राहण्यास भाग पाडले असा आरोप केला. या अगोदर शिवसेनेसोबत गद्दारी करीत मनसेमध्ये गेलेल्या या मामाने पुन्हा एकदा आपल्या स्वार्थासाठी शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी मातोश्रीने त्यांची चूक पोटात घालून त्यांना पुन्हा एकदा शिवसेना पक्षवाढीसाठी संधी दिली होती. परंतु या संधीचे सोने न करता शिवसेनेचा बालेकिल्ला असलेला बडनेरा विधानसभा मतदार संघ अपक्ष आमदाराच्या घशात घालण्याचे काम केले. निवडणुकीच्या काळात काही उचापती करीत आपले उपद्रव मूल्य वाढविणाऱ्या आणि विश्वासहार्यता नसलेल्या या मामावर प्रत्येक निवडणुकीत विरोधी उमेदवाराकडून लाभाच्या वस्तू घेण्याचे देखील आरोप झाले आहे.अशा व्यक्तीला सोबत घेऊन बंड करणाऱ्यांनी जातीचे राजकारण करण्याचा डाव खेळला होता, पण तो त्यांच्यावरच उलटला असेही सुनील खराटे यांनी म्हटले आहे.–

# नागपूर हिवाळी अधिवेशन पाचच दिवसांचे ? कसे सुटणार विदर्भाचे प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ नागपूर : –** विधिमंडळाचे नागपूर हिवाळी अधिवेशन यंदा पाचच दिवसाचे म्हणजे १६ ते२१ डिसेंबर याच दरम्यान होणार असून ती केवळ औपचारिकता ठरणार आहे. विदर्भाचे प्रश्न सुटावे त्यावर विधिमंडळात चर्चा व्हावी म्हणून नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन घेतले जाते. त्याची गांभीर्य दिवसेंदिवस कमी होत गेले.आता तर ती केवळ औपचारिकता म्हणून हे अधिवेशन अक्षरश: उकले जाते. यदा सरकार नवीन आहे हे कारण देत अधिवेशन पाच दिवसाचे होणार,अशी माहिती आहे. त्यामुळे यातून विदर्भाच्या हाताला काही लागण्याची शक्यता कमीच आहे.१६ डिसेंबरपासून अधिवेशन सुरू होईल



२१ तारखेपर्यंत चालेल. काहीच दिवसांपूर्वी नवीन विधानसभेचे गठन झाले. शनिवारपासून नवीन आमदारांच्या शपथविधीला सुरूवात झाली. त्यानंतर मंत्रीमंडळाचा विस्तार केला जाईल. हे नवीन मंत्रीमंडळ अधिवेनाला तोंड देईल. त्यामुळे सरकार नवे असल्याने अधिवेशन गुंडाळले जाईल, अशी शक्यता आहे. या अधिवेशनात तारांकित प्रश्नालाही फाटा देण्यात आला आहे. पाच वर्षांनंतर देवेंद्र फडणवीस यांच्या रूपात विदर्भातील नेता पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाला. विदर्भाचा विकास व त्याकडे तत्कालीन सरकारचे झालेले दुर्लक्ष हा मुद्दा ज्याकाही विदर्भातील नेत्यांनी लावून धरला होता त्यापैकी फडणवीस आहेत. त्यामुळे वैदर्भीयांना या भागाच्या विकासाबाबत ठोस पावले उचलतील, अशी अपेक्षा आहे. या पाश्र्वभूमीवर होत असलेले हिवाळी अधिवेशन फक्त पाचच दिवसाचे असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सरकार सत्तारूढ झाल्यावर व मंत्री मडळाचा शपथविधी झाल्यावर कामकाज सल्लागार समितीची बैठक होईल.त्यांनतर अधिवेशन किती काळ चालेल हे स्पष्ट होईल.पण सध्यातरी पाच दिवसाचे हिवाळी अधिवेशन असेल असे प्रशासनाने सांगितले.विदर्भात होणारे हिवाळी अधिवेशन लोकप्रतिनिधींचे पर्यटन तेही सरकारी खर्चाने अशा स्वरुपाचे आहेत. लोकप्रतिनिधी सहकुटुंब या अधिवेशनासाठी येतात. त्यांच्या राहण्याचा व फिरण्याचा खर्च सरकारी तिजोरीतून होते. विदर्भात व्याघ्र प्रकल्प आहेत. तेथे भेट देण्यासाठी ए कच झुंबड उडते. त्याशिवाय विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळख असलेले चिखलदरा ,रामटेक , कोराडीसह इतर धार्मिकस्थळाला भेट देऊन काही लोकप्रतिनिधी परत जातात. त्यांचा विधिमंडळातील कामकाजात विशेष सहभाग नसतो.

### अमरावती विभागाचा उद्दिष्टपूर्तीत राज्यात तिसरा क्रमांक

# एसटी महामंडळाने गाठला शंभर टक्के उत्पन्नवाढीचा टप्पा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** राज्य परिवहन महामंडळातर्फे प्रवाशांसाठी राबवण्यात येत असलेल्या विविध योजनांमुळे

> एसटी महामंडळातील चालक, वाहक आणि अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे यश प्रवाशांची गर्दी पाहून त्या–त्या मार्गावर फेऱ्यांची संख्या वाढविण्यात आली होती. विभागातील सर्व चालक–वाहक, कर्मचारी, अधिकारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे उद्दिष्टपूर्ती होऊ शकली आहे.
>
> **– नीलेश बेलसरे, विभाग नियंत्रक, अमरावती**



सर्वसामान्यांची 'लालपरी' सुसाट धावत आहे. उत्पन्नाचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करत अमरावती एसटी विभागाने राज्यात तिसरा क्रमांक पटकाविला आहे.

गत नोव्हेंबर महिन्याच्या १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत अमरावती विभागाला प्रतिदिन ६६ लाख १३ हजारांचे उद्दिष्ट होते. विभागाने ६६ लाख ७१ हजार रुपये उत्पन्न प्राप्त करत १००.८७ टक्के आपले उद्दिष्ट प्राप्त करून विभागाने तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम क्रमांकावर रत्नागिरी विभाग, तर द्वितीय क्रमांकावर परभणी विभाग असून अमरावती विभागात राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसमध्ये महिलांना अर्ध्या तिकीट दरात प्रवास करण्याची सवलत दिली आहे.

याशिवाय ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठीही अर्ध्या तिकीट दरात प्रवासाची सवलत असून, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध आहे. या योजनांचा एसटीला चांगला फायदा होत आहे. परिणामी, एसटीच्या प्रवासी भारमानात चांगली वाढ झाली आहे. दिवाळी सुटीत तर १४ नोव्हेंबरपर्यंत प्रवाशांची गर्दी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे प्रवाशांनी भरभरून लालपरी धावत होत्या. अमरावती विभागानेही या सुटीच्या कालावधीत जादा बस सोडल्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला होता. याशिवाय प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन गर्दीच्या मार्गावरील अतिरिक्त फेऱ्या वाढवल्या होत्या. पुणे, नागपूर व जिल्हांतर्गत मार्गावरील जादा गाड्या सोडण्यात आल्या होत्या. एकूणच एसटी महामंडळाच्या अमरावती विभागाने केलेल्या नियोजनामुळे एसटी महामंडळाच्या तिजोरीत भर पडली आहे.

# उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांचे आ.सौ.सुलभा खोडके यांनी केले अभिनंदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९मुंबई :** अमरावती विधानसभा मतदार संघाच्या नवनिर्वाचित आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके या सद्या महाराष्ट्र विधानसभा डिसेंबर– २०२४ तीन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या निमित्ताने मुंबई येथे आहेत. मुंबई येथे असतांना आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह जेष्ठ नेते मंडळीची भेट घेऊन संवाद साधला.महायुती सरकार मध्ये उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेवून सहाव्यांदा उपमुख्यमंत्रीपदी विराजित झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते ना. अजितदादा पवार यांचे अमरावतीच्या आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी अभिनंदन करीत शुभेच्छा व्यक्त केल्यात. महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्री होण्याचा बहुमान व कीर्तिमान ना. अजितदादा पवार यांना मिळाला आहे. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ मध्ये अजितदादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ५८ जागांवर निवडणूक लढवीत ४१ जागा जिंकून महायुती सरकार मध्ये सहभाग दर्शविला आहे. १५ व्या विधानसभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे गटनेता म्हणूनही ना.अजितदादा पवार यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नवनिर्वाचित आमदारांसोबत भेट व संवाद करून नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीवर सुद्धा मनसोक्त चर्चा तसेच मनोगत,परिचय व संवाद करण्यात आला.



# नवनिर्वाचित विधानसभा अध्यक्षांचे अभिनंदन !!



श्री राहुल नार्वेकर साहेब यांची विधानसभा अध्यक्ष पदी निवड झाल्या बद्दल आ. रवि भाऊ राणा यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन व स्वागत केले सोबत आ.रणधीर सावरकर, आ.प्रवीण तायडे, आ.राजेश वानखडे, आ. केवळराम काळे उपस्थित होते.

# खगोलप्रेमींसाठी पर्वणी! १३ अन् १४ डिसेंबरला जेमिनिड्सचा उल्का वर्षाव

### खगोलीय घटना : दर तासाला निर्माण होणार किमान १२० उल्का

**विदर्भ प्रजासत्ताक १५**

दि.९अमरावती १३ व १४ डिसेंबरच्या रात्री आकाशात पूर्व दिशेला उल्का वर्षाव होताना दिसेल. याला जेमिनिड्चा उल्का वर्षाव म्हणतात. हा लघुग्रह व ३२०० फेथॉन नावाच्या छोट्याशा खगोलीय वस्तूंमुळे तयार होतो. ही वस्तू धुमकेतू व लघुग्रह यामधली एक मानली जाते.

हा उल्का वर्षाव खगोलप्रेमी व अभ्यासकांना साध्या डोळ्यांनी पाहता येणार असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली. अंधाऱ्या रात्री आकाशाचे निरीक्षण करीत असताना क्षणार्धात एखादी प्रकाशरेषा चमकून जाताना आपण पाहतो. या घटनेस 'तारा तुटला' असे म्हटले जाते; परंतु तारा कधीही तुटत नाही. ही एक खगोलीय घटना आहे व यालाच 'उल्का वर्षाव' म्हणतात.



उल्काचे निरीक्षण व शास्त्रीय नोंदी याची खगोल जगतात खूप गरज आहे. त्यामुळे बाह्य अवकाशातील वस्तूचे नमुने या उल्केमुळे आपणास मिळतात व यामुळे वस्तूच्या जडणघडणेचा अर्थ लावता येतो. या उल्का वर्षावाचे विलोभनीय दृश्य अवश्य बघावे, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरूळकर यांनी केले आहे.

**हे तर धुमकेतू, लघुग्रहाचे अवशेष**

जेमिनिड्स उल्का वर्षाव हा ३२०० फेथॉन नावाच्या एका छोट्या खगोलीय वस्तूमुळे होतो. ही वस्तू धूमकेतू आणि लघुग्रह यांच्यामधील एक प्रकार मानली जाते. धुमकेतू किंवा लघुग्रह सूर्याला प्रदक्षिणा मारत असताना त्यातील काही भाग मोकळा होतो. हे त्यांचे अवशेष आहेत. याबाबत काही अंधश्रद्धा असल्या तरी याला खगोलशास्त्रात कुठेही थारा नाही.

# कौंडण्यपूर चा अंबा रुख्मिणी महोत्सव ठरला गरजू रुग्णांसाठी आरोग्य संजीवनी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९कौंडण्यपूर–** कौंडण्यपूरच्या यात्रेमध्ये रंगारंग कार्यक्रमांची मेजवानी देऊन गेलेल्या महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन अंबा रुख्मिणी महोत्सव २०२४ हा हजारो गरजू रुग्णांसाठी आरोग्य संजीवनी ठरला. रविराज देशमुख मित्रपरिवार, स्व. शालिनीताई मेघे हॉस्पिटल नागपूर, जीवन आधार बहुद्देशीय संस्था नागपूर, व महाराष्ट्र ग्राम दर्पण यांच्या संयुक्त विद्यमाने कौंडण्यपूर येथे भव्य महाआरोग्य व रोगनिदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये तब्बल ७५ तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती असून यामध्ये हजारो रुग्णांनी मोफत तपासणी केली. सदर शिबिरामध्ये रक्तदान शिबिराचे सुद्धा आयोजन करण्यात आले असून या शिबिरामध्ये शेकडो रक्तदात्यांची रक्तदान केले. यावेळी रक्तदात्यांना भेटवस्तू सुद्धा देण्यात आल्या.

या महाआरोग्य व रोगनिदान शिबिराचे उदघाटन रविराज देशमुख (प्रदेश उपाध्यक्ष, रविराज देशमुख) यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी जीवन आधार बहुद्देशीय संस्था नागपूर चे अध्यक्ष जीवनभाऊ जवंजाळ, श्री अश्विनजी रडके (स्व, शालिनीताई मेघे हॉस्पिटल, नागपूर), श्री राजेंद्र ठाकरे, सौ. गायत्रीताई देशमुख (कोषाध्यक्ष, महाराष्ट्र ग्राम दर्पण), सौ. वर्षाताई गाडगे (महिला जिल्हाध्यक्ष, भाजपा ओबीसी मोर्चा अमरावती), अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे श्री दिनेशराव ठाकरे, श्री गजाननराव बांबल, श्री अंकुशराव देऊळकर, अमोलराव शेंडे, अमोल पुंडेकर, रोशन भगत, प्रतीक कदम, संतोष साठवणे, गोपी वेरूळकर, शाम नरखेडकर, उमेश श्रीखंडे, गोपाल राठोड, सचिन इंगळे, प्रतीक सावळे, चित्राताई बरगट, सतीश निमकर, प्रमोद सपकाळ, प्रशांत कडू, लीलाधरराव साठे, प्रयास भाकरे, वेदांत वानखडे , वैभव हेटे, आकाश ठाकरे, महाराष्ट्र ग्राम दर्पण चंद्रशेखर देवळे, ऋषिकेश ढेपे,



हर्ष पाते, शुभांगी राऊत, साक्षी भोंगे, सोनल बदरके, सुमित जनबंधू, अमर वासनिक, पांडुरंगजी सराडे, दिलीपराव मेहकर, आशिषराव डुबे, गणेशराव बांबल, बाळूभाऊ ठाकरे, निखिल ठाकरे, अंकुश पुंडेकर, सार्थक ठाकरे, दक्ष खंडारे, ओम राऊत यांच्यासह आदींची उपस्थिती होती. यावेळी अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे अक्षय पुंडेकर यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत व अभिनंदन केले.

शेकडो रुग्णांची मोफत तपासणी तर अनेक रुग्ण लाखो रुपयांच्या मोफत शस्त्रक्रियेसाठी नागपूर रवाना विशेषतः या शिबिरामध्ये ज्यामध्ये मेडिसिन, स्त्रीरोग, अस्थिरोग, नेत्ररोग, बालरोग, दंतरोग, न्यूरोलॉजी, शल्यचिकित्सक, नाक–कान–घसा, मेंदू शस्त्रक्रिया (न्यूरो सर्जन), किडनी रोग तज्ञ, हृदय रोग चिकित्सक अशा विविध रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली असून त्या सर्व रुग्णांना लाखो रुपयांच्या मोफत शस्त्रक्रियेसाठी नागपूर येथे रवाना करण्यात आले. यावेळी अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे गजाननराव बांबल, अक्षय पुंडेकर, यांनी रुग्ण रथाची पूजा करून बस चालक व वाचकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्याचबरोबर सर्व रुग्णांना सुद्धा गुलाबपुष्प व फळ देऊन यशस्वी उपचारासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व रुग्णांच्या वतीने रविराज देशमुख मित्रपरिवार व अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे आभार मानले.

# विवाह निमंत्रणपत्रिकेच्या बहाण्याने सायबर घोटाळा

# 'एपीके फाइल'ने राज्यात अनेकांची फसवणूक झाल्याचे उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९नागपूर :** एखाद्या अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सअ‍ॅपवर लग्नपत्रिका पाठवल्यानंतर उत्सुकतेपोटी किंवा एखाद्या नातेवाईकाचे लग्न असल्याचे वाटून ती पत्रिका उघडण्यात येते. लग्नपत्रिकेच्या नावाने 'एपीके फाइल' डाऊनलोड होते. मात्र, काही क्षणातच भ्रमणध्वनीचे नियंत्रण दुसऱ्याकडे गेल्याचे लक्षात येते. हा प्रकार सायबर गुन्हेगारांचा नवा सायबर घोटाळा आहे. आतापर्यंत राज्यभरातून अशा प्रकारे फसवणूक झाल्याच्या शेकडो तक्रारी समोर आल्या आहेत.

सायबर गुन्हेगार ग्राहकांना जाळ्यात ओढण्यासाठी नवनवीन क्लृप्त्यांचा वापर करतात. पूर्वी बँकेतून बोलतोय किंवा तुमचे बँक खाते बंद होत असल्याची भीती घालून सायबर गुन्हेगार एटीएम कार्डचा पासवर्ड मिळून फसवणूक करीत होते. त्याबद्दल सतर्कता वाढल्यानंतर सायबर गुन्हेगारांनी नवीन प्रकार सुरू केला आहे. अनेकांच्या भ्रमणध्वनीमध्ये 'लग्नपत्रिका डॉट एपीके' नावाने एक चित्रफीत येते. अनोळखी क्रमांकावरून ही चित्रफीत आली तरी अनेक जण ती डाऊनलोड करतात.

त्यानंतर काही वेळातच भ्रमणध्वनी आपोआप बंद पडतो. पुन्हा सुरू केल्यानंतर काही सेटिंग बदललेली दिसते. सायबर गुन्हेगार 'एपीके फाइल'च्या माध्यमातून छुप्या पद्धतीने भ्रमणध्वनीवर नियंत्रण मिळवतात. त्यानंतर भ्रमणध्वनीमधील संदेश, क्रमांक, छायाचित्र, चित्रफिती, बँक खाते, एटीएम कार्ड, क्रेडिट कार्ड, पेमेंट ॲप यासोबतच व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक आणि इंस्टाग्रामचे नियंत्रण सायबर गुन्हेगार स्वत:कडे करून घेतात. भ्रमणध्वनीमध्ये ठेवलेले आधारकार्ड, पॅन कार्ड व अन्य कागदपत्रांचाही गैरवापर करण्यात येतो.

> **भ्रमणध्वनीचा ताबा मिळवून फसवणूक**
>
> सायबर गुन्हेगार सर्वाधिक वेळा पेटीएम, गुगल पे व अन्य पेमेंट ॲपचा वापर करून काही वस्तू ऑनलाइन खरेदी करतात. त्या वस्तूंचे शुल्क जाळ्यात अडकलेल्या ग्राहकाच्या पेमेंट ॲपमधून करण्यात येते. तसेच बँक खात्यातून पैसे काढून सायबर गुन्हेगार स्वत:च्या खात्यात वळते करतात.



> **'एपीके' (अँड्रॉईड पॅकेजिंग किट) स्वरूपाच्या फाइल डाऊनलोड करू नका. कारण अशा फाइलमधून सायबर गुन्हेगार तुमच्या भ्रमणध्वनीवर नियंत्रण मिळवू शकतात. या नव्या फसवणुकीच्या प्रकारापासून सावध राहावे. फसवणूक झाल्यास त्वरित १९३० या क्रमांकावर फोन करावा किंवा पोलीस ठाण्यात तक्रार करावी. – अमित डोळस, पोलीस निरीक्षक, सायबर गुन्हे**


# समृद्धी महामार्गावरील कृषी केंद्रांसाठी अजूनही निधीची तरतूदच नाही

## आतापर्यंत ८,३१० हेक्टर जमीन संपादित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर एकूण १८ कृषी समृद्धी केंद्रे उभारण्यात येणार आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यात वर्धा जिल्ह्यातील केळझर, विरूळ, बुलडाणा जिल्ह्यातील साब्रा काब्रा व सावरगाव माळ, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील हडस पिंपळगाव व घायगाव, जांबरगाव येथे कृषी समृद्धी केंद्रे उभारण्यात येणार आहेत. मात्र, या सातही कृषी समृद्धी केंद्रांसाठी निधीची तरतूद करण्यात आली नसल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातील सूत्रांनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

सातही कृषी समृद्धी केंद्रांसाठी सरासरी ६१% शेतकऱ्यांनी संमती दिलेली आहे. या योजनेत शेतकऱ्यांना त्यांनी दिलेल्या जमिनींपैकी ३०% विकसित भूखंड देण्याची



योजना आहे. तसेच पहिली १० वर्षे प्रतिवर्षी प्रतिएकर जिरायती जमिनीसाठी ४५ हजार, हंगामी बागायतीसाठी ६० हजार रुपये आणि बागायतीसाठी ७५ हजार अनुदान देण्याची योजना आहे. समृद्धी महामार्गासाठी आतापर्यंत ८,३१० हेक्टर जमीन संपादित केली असून त्यापोटी ८,१०२ कोटी मोबदला देण्यात आला आहे.

### पुढील महिन्यांत सुरू होणार

समृध्दी महामार्गाचे काम जवळपास पूर्ण झालेले आहे. आतापर्यंत एकूण ७०१ किमी पैकी नागपूर ते इगतपुरी हा ६२५ किमीचा महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहे.पुढील महिन्यात उर्वरित इगतपुरी ते आमणे (ता. भिवंडी, जि. ठाणे) ही ७६ किमीची लांबी खुली करण्याचे नियोजन आहे.

### १६९८ पैकी २२९ कोटी खर्च

अत्याधुनिक इंटेलिजंट ट्रान्सपोर्टेशन सिस्टिमच्या कामाचा संकल्प अहवाल व डिझाइन तयार करण्यात आला आहे. केबल टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. ११ जुलै २०२४ मध्ये काम सुरू केलेले काम ११ एप्रिल २०२६ मध्ये पूर्ण करायचे आहे. कामाची एकूण किंमत १६९८ कोटी असून आतापर्यंत फक्त २२९ कोटी खर्च झाल्याची माहिती एसएसआरडीसीच्या सूत्रांनी दिली. सध्या समृद्धी महामार्गावर अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत.

### आठ ठिकाणी पेट्रोल पंप

समृद्धी महामार्गावर एकूण ३० ठिकाणी मार्ग सुविधा उपलब्ध होतील. यामध्ये सर्व सुविधांनी युक्त अशी २२ ठिकाणे असणार आहेत व ८ ठिकाणी फक्त पेट्रोल पंप असणार आहेत. सर्व सुविधांनी युक्त अशा परिपूर्ण मार्ग सुविधा १६ ठिकाणी उभारण्यासाठी ७ ते ८ वेळा निविदा बोलावण्यात आल्या होत्या. परंतु त्याला प्रतिसाद मिळत नसल्याचेही समोर आले.

### गॅस पाइपलाइन फेब्रुवारी २०२५ मध्ये होणार पूर्ण

गेल कंपनीची गॅस पाइपलाइन टाकली जात आहे. त्यासाठी समृद्धी महामार्गाच्या रांगेमध्ये एका बाजूने ३.० मीटर रुंदीची जागा गेल कंपनीस भाडेतत्त्वावर देण्यात आलेली आहे. यासाठी गेल कंपनीकडून ६० वर्षांसाठी ४३५ कोटी भाडे म्हणून घेण्यात आली आहे. ६७० किमीमध्ये गेल कंपनीची पाइपलाइन टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित २८ किमीचे काम फेब्रुवारी २०२५ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

# नांदेडमध्ये ७५ केंद्रांवर ईव्हीएम, व्हीव्हीपॅटची पडताळणी; ईव्हीएम आरोप निघाले बिनबुडाचे ....

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ९ नांदेड**

देशात आणि राज्यात ईव्हीएमवर संशय व्यक्त करण्यात येत आहे; परंतु निवडणूक आयोगाच्या सूचनेवरून प्रशासनाने प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील पाच केंद्रांच्या ईव्हीएम मशीनवरील उमेदवारनिहाय मतांची व्हीव्हीपॅटशी जुळवणी होते काय? याची तपासणी केली असता लोकसभेच्या ३० आणि विधानसभेच्या ४५ अशा एकूण ७५ मतदान केंद्रांवरील मतमोजणी बिनचूक निघाली असून त्यात एकाही मताचा फरक नसल्याचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी सांगितले. वेगवेगळ्या राज्यांतून आलेले वरिष्ठ सनदी अधिकारी हे निवडणूक निरीक्षक म्हणून असतात. त्यांच्यासमोर ही पडताळणी केली जाते.



### कशी झाली निवड आणि मोजणी?

जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघांतील प्रत्येकी ५ प्रमाणे ४५ मतदान केंद्रांची व्हीव्हीपॅट पडताळणी करण्यात आली असून सर्व ४५ ठिकाणी व्हीव्हीपॅट व ईव्हीएम कंट्रोल युनिट यातील उमेदवारनिहाय मतांची आकडेवारी पूर्णतः जुळली आहे. तसेच लोकसभा पोटनिवडणुकीसाठी लोकसभेतील ६ विधानसभा क्षेत्रांतील प्रत्येकी ५ प्रमाणे ३० मतदान केंद्रांवरही एकाही मताचा फरक आढळला नाही. या ५ केंद्रांची निवड लॉटरी पद्धतीने उमेदवार, मतमोजणी प्रतिनिधी यांच्या समक्ष चिठ्ठी काढून झाली.

# नायलॉन मांजा विक्रीवर मनपाच्या भरारी पथकांची नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राष्ट्रीय हरित लवादाने पतंगबाजी करीत असतांना नायलॉन धागा वापरण्यास बंदी घातली आहे. तरीही शहरातील पतंगबाजी करणारे काहीजण नायलॉन मांजाच्या शोधात असतात. त्यामुळे पतंग 'उडविण्यासाठी नायलॉन मांजाचे उत्पादन, उपयोग व विक्री आणि आयात करणारे आढळल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) यांनी दिले आहेत. मनपा भरारी पथकांद्वारे नियमित पलंग, मांजा विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करण्यात येत असून दर दिवसाच्या कारवाईचा अहवाल महानगरपालिका अतिरिक्त आयुक्तांद्वारे मागविण्यात येत आहे. दरवर्षी तीळसंक्रांतीच्या उत्सवाला पतंग उडविण्याची परंपरा आहे. त्यासाठी महिनाभरा आधीपासूनच पतंग आणि दोरा यांची विक्री सुरु होते.

नायलॉन धागा वापरण्यास बंदी असतांना शहरात हा धागा वापरला जात असल्याचे आढळून येते. याच्या वापराने पशु-पक्षी तसेच नागरिकांनासुद्धा गंभीर इजा झाल्याच्या घटना घडल्या आहेत. महानगरपालिकेचे उपद्रव शोधपथक यावर कारवाई करत असून नायलॉन मांजा बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी मनपाच्या माध्यमातून विशेष पथक स्थापन करण्यात आले आहे. बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर १० हजारांचा दंड आणि साठा आढळल्यास १ लाखाच्या दंडासह फौजदारी कारवाई आणि साहित्य जप्त केले जाणार आहे.

# जिल्ह्यात १,३३३ घरे दुकाने प्रकाशमान, महावितरणही मालामाल!




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद (पीडी) केल्याने अंधाराचा सामना करणाऱ्या जिल्ह्यातील १ हजार ३३३ ग्राहकांना महावितरणने मोठा दिलासा दिला आहे. या नागरिकांची घरे, दुकाने व इतर आस्थापना पुन्हा प्रकाशमान झाल्या आहेत. त्यापोटी महावितरणला १ कोटी ६७ लाख ६२ हजार ४७४ रुपयांचा महसूलदेखील प्राप्त झाला आहे.

वर्षानुवर्षे बील न भरल्यामुळे महावितरणने २ हजारावर दुकाने, घरे व इतर आस्थापनांचा वीज पुरवठा कायमस्वरुपी बंद (परमनंट डिस्कनेक्ट/पीडी) केला होता. दरम्यानच्या काळात या ग्राहकांसाठी महावितरणने 'अभय योजना' लागू केली. सप्टेंबरपासून लागू झालेली ही योजना सर्वांसाठी खुली होती. त्याचा लाभ जिल्ह्यातील १ हजार ३३३ ग्राहकांनी घेतला. त्यामुळे त्यांच्या वीज जोडण्या पुर्ववत करण्यात आल्या असून ती घरे व आस्थापना प्रकाशमान झाल्या आहेत. नव्याने पूर्ववत झालेल्या या आस्थापनांमध्ये काही गृह उद्योगांचाही समावेश आहे. या गृहउद्योगांमध्ये छोटी-मोठी यंत्रे वापरली जात होती. या यंत्रांचा वीज पुरवठादेखील कायमस्वरुपी बंद करण्यात आल्याने ते गृहउद्योगही अडचणीत आले होते. आता ते गृहउद्योगसुद्धा सुरु झाले आहेत. दरम्यान थकीतबाकी असलेल्या उर्वरित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून ऑनलाईन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल, असे महावितरणचे म्हणणे आहे. शिवाय मोबाईल पवरूनही योजनेचा लाभ घेता येणार असून वीज ग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावरसुद्धा फोन करून माहिती घेऊ शकतात.

# महिनाभरापासून आय ओटी बंद : जिल्हा सामान्य रुग्णालयातील नेत्र शस्त्र क्रियांना ब्रेक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथील आय ओटी एक महिन्यापेक्षा आस्त कालावधीफसून बंद आहे. या औटी परिसरात सुरू असलेल्या नव्या आयसीयू इमारतीच्या कामकाजामुळे येथे होणाऱ्या मोतीबिंदू तसेच इतर डोळ्यांच्या शस्त्रक्रिया थांबल्या आहेत. त्यामुळे ज्या रुग्णांची इमर्जन्सी शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे. अशा रुग्णांना डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे रेफर करण्यात येत असल्याची माहिती आहे.




जिल्हा सामान्य रुग्णालय येथील डोळ्यांच्या ओपीडीमध्ये रोज ७० ते ८० रुग्ण हे उपचारासाठी येतात. यामध्ये वयोवृद्ध रुग्णांचा समावेश मोठ्या प्रमाणावर असती. यामध्ये मोतीबिंदूमुळे दिसण्याया त्रास असलेल्या रुग्णांच्या मोफत शस्त्रक्रियादेखील याच ठिकाणी करण्यात येतात. रोज सरासरी २० ते २५ रुग्णांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रिया रुग्णालयात होतात, तर महिन्याला जवळपास सहाशे ते सातशे मोतीबिंदू शस्त्रक्रिया होतात. जिल्ह्यात केवळ इर्विन या शासकीय रुग्णालयातच डोळ्यांच्या शस्त्रक्रिया होत असल्याने येथे ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. येथील नेत्र विभागातील कामाची दखल घेतराज्य शासनाच्या वतीने या विभागाला गौरविण्यात आले होते; परंतु एक महिन्यापासून येथील डोळ्यांच्या शस्त्रक्रिया बंद आहेत. आय ओटी परिसरातच ५० खाटांच्या आयसीयू इमारतीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे देवील धूळ आय ओटीमध्ये येत असल्याने या शस्त्रक्रिया थांबविण्यात आल्या आहेत. त्यामुळे येथील आय ओपीडी सुरू करण्याची मागणी होत आहे.

# अमरावती तहसील कार्यालय प्रकरणात दस्ताऐवज गहाळ प्रकरणी

## फौजदारी व प्रशासकीय कारवाईचे राज्य माहिती आयोगाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

वलगांव येथील अंकूश कल्हाने यांनी दि. २९.०९.२०१८ रोजी माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय, अमरावती यांचेकडे सादर करुन महसूल प्रकरण क्रं. आरटीएस-६४/वलगांव-१३/२००५-०६ या प्रकरणातील रोजनामा व अन्य कागदपत्रांची मागणी केली, मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी प्रथम अपिल दाखल केले. त्यात त्यावेळेसचे तहसिलदार अमरावती यांनी ७ दिवसात माहिती प्रदान करण्याचे निर्देष दिले. त्यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी विद्यमान राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले.

राज्य माहिती आयोगाद्वारा सदर अपिल प्रकरणात ४ वेळा सुनावणी घेण्यात आली. सदरचे महसूल प्रकरण तहसिलचे अभिलेखागारात त्यावेळेच्या अधिकाऱ्यांनी ठेवले नाही तसेच वि. राज्य माहिती आयोगासमोर चुकीचा दिशाभूलकरणारा व बेजबाबदारपणे खुलासा सादर करण्यात आला. त्याची नोंद आयोगाने आदेशात घेतली आहे. त्यामूळे प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आयोगाने रेकॉर्ड शोधण्याची संधी दिल्यानंतर सुद्धा कागदपत्र मिळून न आल्याने वि. जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात कागदपत्र उपलब्ध नसल्याबाबत नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र सादर करावे व मागणी केलेले प्रकरण जाणुनबुजून गहाळ झाल्याचे निदर्शनास आल्यास जबाबदार व्यक्ती विरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ चे कलम ९ नुसार प्रशासकीय फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याचे व त्याबाबतचा अहवाल आयोगाकडे सादर करावा असे निर्देश दिलेत. सदर प्रकरणात अपिलार्थी अंकुश कल्हाने यांचे तर्फे ॲड. राजेंद्र पांडे यांनी युक्तीवाद केला.

# महात्मा फुले यांचे कार्य केवळ एका समाजासाठी नव्हते तर सर्व समाजाच्या कल्याणासाठी होते : मंदाकिनी निमकर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ अमरावती**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य केवळ एका विशिष्ट समाजासाठी नव्हते तर सर्व समाजाच्या कल्याणासाठी व उन्नतीसाठी होते म्हणूनच त्यांना आपण महात्मा म्हणतो असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण समितीच्या अध्यक्षा मंदाकिनी निमकर यांनी केले. त्या महात्मा फुले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. महात्मा फुले हे तंत्रज्ञ,इंजिनीयर,



व्यवसायी होते. असे महान लोक सहजासहजी जन्माला येत नाहीत असे देखील यावेळी मंदाकिनी निमकर यांनी सांगितलेयावेळी विद्यार्थ्यांनी देखील महात्मा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व महात्मा फुले शिक्षण समितीचे सचिव माजी प्राचार्य रमेश पवार यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महात्मा फुले शिक्षण समितीचे सहसचिव प्रा किशोर श्रीखंडे, सदस्य डॉ.जयंत पवार, प्राचार्य मंगेश गोरडे होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक गजानन पोटदुखे,अमोल इंगळे, अनिल मावसकर, शिक्षकेतर कर्मचारी मिलिंद बेलसरे, किसन चव्हाण, राजेश ढेवले आदींनी परिश्रम घेतले.

# हा धर्म समन्वय कर्ता विरळा संत...! - ह.भ.प. नयना बच्चू कडू

## गीता जयंती महोत्सवाला भाविकांची अलोट गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९चांदुर बाजार**

वयाच्या नवव्या महिन्यातच अंधत्व आल्यानंतर सुद्धा संपूर्ण जगाचा अभ्यास असणारे गुलाबराव महाराज हे असामान्य आणि अलौकिक संत होते.विसाव्या शतकातील संत श्रीगुलाबराव महाराज केवळ ३४ वर्षे आपले आयुष्य जगले आणि त्यांनी आपल्या ३४ वर्षांच्या कारकिर्दीत १३४ ग्रंथ लिहिले जे आजच्या जीवनशैलित अत्यंत महत्वाचे आहे. आजच्या पिढीसाठी उत्तम डोळस उदाहरण देखील आहे.परमेश्वराच्या या अवताराने आपल्या जिल्ह्यात जन्म घ्यावा यापेक्षा आपले मोठे भाग्य नाही असे अमूल्य विचार ह.भ.प नयना बच्चू कडू यांनी व्यक्त केले.संत श्री गुलाबराब महाराज सेवा संस्थांन बोराळा यांच्या वतीने आयोजित गीता जयंती महोत्सवात गुलाब गौरव कथेच्या माध्यमातून त्या महाराजांच्या कथे बद्दल आपला विचार व्यक्त करत होत्या. ५ डिसेंबर ते १२ डिसेंबर दरम्यान भक्तीधाम चांदुर बाजार येथे गीता जयंती महोत्सव आयोजित करण्यात आला असून दुपारी २ ते ५ दरम्यान ह.भ.प. नयना कडू या गुलाब गौरव कथेच्या माध्यमातून संत गुलाबराव महाराज यांचे आध्यत्मिक व विज्ञानवादी विचार मांडत आहेत.हभप नयना कडू यांनी संत गुलाबराब महाराज यांच्यावर पीएचडी केलेली असून गुलाबराव महाराज यांचे जन्म ठिकाणापासून तर ज्या ज्या ठिकाणी महाराजांचे वास्तव्य राहले आहे अश्या अनेक राज्यातील त्या त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष संदर्भ त्यांनी घेतलेले आहेत. पुढे त्या म्हणाल्या की, आपण कल्पना करु शकणार नाही की एक आंधळी व्यक्ती एवढी पुस्तके लिहु शकतो,तेही वेगवेगळया विषयावर जसे ध्यान, योग, उपनिषद् , ब्रम्हसुत्र , थियोसोफी शास्त्र



कठीणातले कठीण असे विषय त्यांना समजले. ज्यांचे खुप शिक्षण झाले आणी जे अत्यंत हुशार आहेत, त्यांना सुध्दा असे विषयावर लिखाण केले नसेल. त्यांना शास्त्राचा अभ्यास करण्यास वेळ कधी मिळायचा? संस्कृत भाषेचे ज्ञान त्यांनी कसे मिळविले? त्यांची लिहीण्याची वैदीक पध्दत त्यांनी कशी अवगत केली? हे सर्व प्रश्न आपल्या मन - बुध्दीला पडतात जेव्हा त्यांचे जीवन चरित्र आपण वाचतो. गुलाबराव महाराज स्वत:ला ज्ञानेशकन्या आणी भगवान श्रीकृष्णाची पत्नी मानायचे. १९०१मध्ये श्री ज्ञानेश्र्वर महाराज यांचा प्रत्यक्ष अनुग्रह व १९०५ मध्ये भगवान श्रीकृष्णाचा रासलीला अधिकार श्री महाराजांनी प्राप्त केला. १९०२ मध्ये ते २१ वर्षाचे होते तेव्हा त्यांनी डार्वीन आणी स्पेनसरच्या तत्वज्ञानावर खंडन मांडणं करणारे विचार प्रगट केले जे आजची आपणास विचार करायला भाग पाडतात. त्यांनी वेगवेगळया विषयावर पुस्तके लिहीली जसे ध्यान, योग आणि भक्ती. त्यांनी 'मानसायुर्वेद' नावाचे पुस्तक लिहीले ज्यात शास्त्रीयदृष्टया आयुर्वेदाची माहीती लिहीली असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले. श्री गुलाबराव महाराज यांच्या अनेक ग्रंथांचा समीक्षात्मक विवरण करता पूर्णतः त्या सर्व सूत्रांचा मार्मिक आणि उदाहरणासह विवेचन आदरणीय ताई करत आहेत. श्री गुलाबराव महाराजांचे चरित्र आणि त्यांच्या साहित्याचा पुरेपूर अभ्यास असून सुद्धा श्री महाराजांवरती ज्यांची पूर्ण निष्ठा आहे त्यांच्याजवळ श्री महाराजांच्या अनेक अनुभूती प्रचितीला येतात असे त्यांचे ठाम मत आहे. संत गुलाबराव महाराज यांचा भक्त परिवार अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात व राज्याबाहेर देखील आहे. गीता जयंती महोत्सवाला दूरवरून भाविक भक्त आले असून गुलाब गौरव कथा ऐकण्यासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली आहे.ह.भ.प.नयना बच्चू कडू यांनी संत गुलाबराव महाराज यांचे अनेक संदर्भ आणि त्यांच्यामधील अध्यात्म सोप्या भाषेत भाविकांसमोर मांडले.भाविकांना माहीत नसणाऱ्या काही अध्यात्मिक बाबींचा देखील उलगडा यावेळी ह.भ.प.नयना कडू यांनी केला.यावेळी पंचक्रोशीतील असंख्य भाविक भक्त गुलाब गौरव कथा श्रवण करण्यासाठी उपस्थित होत आहे.

# २०२२ च्या व्याघ्र गणनेनुसार आज महाराष्ट्रात सर्वाधिक जवळपास ४४६ वाघ

## राज्यात वाघांचे प्रमाण हे २३ टक्क्याने वाढत असल्याचे संकेत : भारतीय वन्यजीव संस्थेचा अहवाल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९अमरावती

महाराष्ट्रात वाघांची संख्या झपाट्याने वाढत आहे. वन्यजीव संस्थेच्या अहवालानुसार २०२२ च्या व्याघ्र गणनेनुसार महाराष्ट्रात जवळपास ४४६ वाघ आहेत. २००६ मध्ये महाराष्ट्रात वाघांची संख्या ही १०३ इतकी होती. २०१० च्या व्याघ्रगणनेनुसार महाराष्ट्रात वाघांची संख्या ही १६८ वर पोहोचली. २०१४ मध्ये महाराष्ट्रात एकूण १९० वाघ होते. पुढील चार वर्षात वाघांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली. २०१८ च्या व्याघ्र गणनेनुसार महाराष्ट्रात ३१२ वाघ होते. वाघांच्या संख्यावाढीचा आलेख पुढील चार वर्षे देखील कायम राहिला. २०२२ च्या व्याघ्र गणनेनुसार आज महाराष्ट्रात जवळपास ४४६ वाघ आहेत. राज्यात वाघांचे प्रमाण हे २३ टक्क्याने वाढत असल्याचे शुभ संकेत आहेत, असे महाराष्ट्र वन्यजीव मंडळाचे माजी सदस्य यादव तरटे यांनी सांगितले.



### व्याघ्र संवर्धनासाठी सज्ज होण्याची गरज

आज वाघांच्या बाबतीत जगात भारत पहिल्या क्रमांकावर आहे. त्यातही महाराष्ट्रात वाघांची संख्या सर्वाधिक असणे, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. १९०० मध्ये भारतात एकूण ४०,००० वाघ होते. १९७१ मध्ये दुर्दैवाने भारतात केवळ १८०० वाघ उरले होते. देशाच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वाघांच्या मोठ्या प्रमाणात खालावलेल्या संख्येची गांभीर्याने दखल घेत भारतीय वन्यजीव अधिनियम १९७२ हे कलम लागू केले. तसेच १९७३ मध्ये व्याघ्र प्रकल्प योजना जाहीर केली.

### व्याघ्र प्रकल्पावर मोठी जबाबदारी

व्याघ्र प्रकल्प योजनेमुळे वाघांसह जंगलातील इतर प्राण्यांचे संरक्षण व्हायला लागले. आता वाघांची संख्या वाढायला लागली असतानाच हे वाघ जंगलाबाहेर जाणार नाही, याबाबत व्याघ्र प्रकल्पावर मोठी जबाबदारी राहणार आहे. वाघ आणि मानवांचा संघर्ष होणार नाही, याची काळजी घेणे देखील गरजेचे आहे. वाघांची शिकार होणार नाही, याबाबत देखील व्याघ्र प्रकल्पासह वन विभागाला सज्ज राहणे अत्यंत गरजेचे आहे, असे देखील यादव तरटे म्हणाले.

### वाघांची ७० टक्के संख्या भारतात

२०१८ मध्ये संपूर्ण जगात एकूण ३८९० वाघ आढळून आले आहेत. २०१८ मध्ये भारतात वाघांची संख्या ही २९६७ इतकी होती. आज २०२३ मध्ये भारतात एकूण ३,१६७ वाघ आहेत. या ३ हजार १६७ वाघांपैकी ४४६ वाघ हे महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्रात वाघांची संख्या ही सर्वाधिक विदर्भात आहे. वाघांची संख्या आता झपाट्याने वाढत आहे. वाघांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. व्याघ्र प्रकल्प आणि महाराष्ट्र शासन महाराष्ट्रातील वाघांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यास निश्चितपणे यशस्वी ठरेल, असा विश्वास देखील यादव तरटे यांनी व्यक्त केला.

# अमरावती केंद्रावरील राज्य नाट्य स्पर्धेला १३ डिसेंबर पासून सुरुवात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९अमरावती

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६३ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धा प्राथमिक फेरी अमरावती येथे अरविंद लिमये नाट्यगृह, सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय येथे सुरू होत आहे. दिनांक १३ डिसेंबर ते २६ डिसेंबर या दरम्यान या स्पर्धा होतील. या स्पर्धेत संध्याकाळी सात वाजता नाटकाचे प्रयोग सादर होणार आहेत.

सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे.

या स्पर्धेमध्ये एकूण १४ संघांचा सहभाग आहे. अमरावती शहर व संपूर्ण जिल्ह्यातील संघ या स्पर्धेत




सहभागी होत आहेत. राज्य नाट्य स्पर्धेतील नाटक पाहण्यासाठी नाममात्र रु- १५/- व १०/- तिकीट ठेवण्यात आलेलं आहे. राज्यनाट्य स्पर्धेतील सर्व नाटकांना जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित राहावे आणि हौशी रंगकर्मींचा उत्साह वाढवावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केलेले आहे. वातानुकुलीत आणि सुसज्ज सभागृहात वेळेवर उपस्थित राहून विविध नाटकांचा आस्वाद घ्यावा आणि कलावंतांचा आनंद वाढवावा अशी विनंती स्पर्धा समन्वयक विशाल फाटे आणि सहसमन्वयक कोमल तायडे यांनी केली आहे.

# प्रहारचा सेवेचा वारसा निरंतर सुरू राहणार - बच्चू कडू

## आनंद सभागृह येथे प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन : ३१६ पिशव्या रक्त संकलन




विदर्भ प्रजासत्ताक
दि. ९ चांदुर बाजार

येथील आनंद सभागृह येथून प्रहारने पहिल्यांदा रक्तदान करून आपल्या सेवाकार्याची सुरुवात केली आणि आज लाखो रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी प्रहारच्या प्रत्येक कार्यकर्त्याने केलेली धडपड सर्वांनी याची देही याची डोळा बघितली आहे. ज्या कार्यकर्त्यांनी हजारो रक्तदान शिबीरे आयोजित केली, ज्यांनी अनेक रूग्णांचे प्राण वाचवले आज त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ रक्तदान शिबीर अयोजित करणे वेदनादायी आहे मात्र त्यांच्या आणि प्रहारच्या या सेवेचा वारसा मात्र निरंतर सुरू राहणार यात तिळमात्र शंका नाही असे प्रतिपादन प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक तथा माजी आ. बच्चू कडू यांनी आनंद सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात केले. प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने प्रहारचे दिवंगत कार्यकर्ते स्व. ऋषभ गावंडे व स्व. सोपान कोरडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आज (दि.९ डिसेंबर) आनंद सभागृह चांदुर बाजार येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.यावेळी या रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बच्चू कडू बोलत होते.३१६ कार्यकर्त्यांनी या शिबिरात रक्तदान करून प्रहारच्या दिवंगत सेवकांना श्रद्धांजली अर्पण केली. प्रहार हा कुण्या नेत्यांचा पक्ष नाही तर तो कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. प्रहारचा कार्यकर्ता जोपर्यंत सेवेचा झेंडा घेऊन गोरगरीब, वंचित, दिव्यांग,कामगार आणि शेतकरी बांधवांसाठी काम करेल तोपर्यंत बच्चू कडू कार्यकर्त्यांच्या खांद्याला खांदा लावून तेवढ्याच ताकदीने काम करेल त्यामुळे आपण निवडणूक हरलो काय अन जिंकलो काय याचा आपल्याला आणि आपल्या कार्यकर्त्यांना कधीच फरक पडला नाही. आम्ही काही नसतांना सुद्धा जनतेचे काम प्राधान्याने केले आणि आजही आम्ही तेवढ्याच निष्ठेने जनतेची कामे करणार कारण सेवा भाव आमच्या रक्तात आहे असेही बच्चू कडू यावेळी म्हणाले. प्रहारचे कार्यकर्ते स्व. ऋषभ गावंडे व स्व. सोपान कोरडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी या कार्यक्रमाचे आनंद सभागृह येथे आयोजन करण्यात आले होते.

# डॉ. श्रीकर परदेशी मुख्यमंत्र्यांचे सचिव होताच यवतमाळात आनंद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९ यवतमाळ

महाराष्ट्राचे नवनिर्माण करताना प्रशासन अधिक पारदर्शी व गतिमान राहील असा संदेश नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामकाजाच्या पहिल्याच दिवशी दिला. आपले सचिव म्हणून डॉ. श्रीकर परदेशी यांची नियुक्ती करून त्यांनी येत्या काळात महाराष्ट्राचे प्रशासन कसे राहील, याचा सूचक इशारा दिल्याचे मानले जात आहे. डॉ. परदेशी यांच्या नियुक्तीने यवतमाळातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला असून जिल्ह्यातही आनंद व्यक्त होत आहे.



डॉ. श्रीकर परदेशी यांनी पुण्याच्या बी.जे.मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस, एमडी असे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करून २००१ मध्ये आयएएस झाले. २००५ मध्ये यवतमाळ जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ते रुजू झाले होते. सीईओ म्हणून यवतमाळात त्यांची पहिलीच नियुक्ती होती. २००५ ते २००७ या दोन वर्षांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेचा कारभार गतिमान आणि पारदर्शी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात राबविलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात यवतमाळ जिल्हा परिषदेस विभाग आणि राज्यस्तरावरील पुरस्कार मिळाले होते. याशिवाय शिक्षण, आरोग्य, जलसंधारणच्या विविध योजनांची आणि उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी त्यांनी या काळात केली होती. जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांनी घेवून चालणारे अधिकारी म्हणून त्यांनी लौकीक मिळविला होता. यासोबतच ते सर्वसामान्य जनतेतही तेवढेच लोकप्रिय होते. त्यावेळी सर्वसामान्य जनतेसाठी त्यांच्या कक्षाचे दार कायम खुले राहत होते. यवतमाळच्या कारकीर्दीत त्यांनी राबविलेली कर्मचारी भरती प्रक्रिया पुढे राज्यासाठी 'रोल मॉडेल' ठरली. त्यांच्या कार्यकाळात अनेक होतकरू तरूणांना जिल्हा परिषदेत केवळ गुणवत्तेच्या जोरावर नोकरी मिळाली. तेव्हा डॉ. श्रीकर परदेशी यांचे छायाचित्र देव्हाऱ्यात ठेवून त्यांची पूजा करणारे अनेक कर्मचारी आजही जिल्हा परिषदेत कार्यरत आहेत.यवतमाळ येथून त्यांची बदली अकोला जिल्हाधिकारी पदी झाली. तेव्हा सर्वसामान्य नागरिकांसह अधिकारी, कर्मचारी संघटनांनी या बदलीस विरोध करून त्यांना यवतमाळातच कायम ठेवण्याची मागणी लावून धरली. त्यावेळी जिल्हा परिषदेत 'परदेशी परदेशी जाना नहीं' हे गाणे प्रत्येकाच्या मुखी होते. डॉ. परदेशी यांची यवतमाळनंतर त्यांनी अकोला, नांदेड जिल्हाधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त म्हणून काम केले. नांदेडमध्ये असताना त्यांना जलसंवर्धनासाठी पंतप्रधान पुरस्कार मिळाला होता. पिंपरी चिंचवड येथे आयुक्त असताना राजकीय दबाव झुगारून त्यांनी शहरातील अतिक्रमण जमीनदोस्त केल्याने ते प्रसिद्धीच्या झोतात आले होते. प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या पारदर्शी व लोकाभिमूख कार्यपद्धतीने जनतेच्या मनावर अधिराज्य गाजविले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही त्यांच्या कार्यपद्धतीची भूरळ पडली. त्यामुळे २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. श्रीकर परदेशी यांना पंतप्रधान कार्यालयात सचिव पदी नियुक्ती दिली. तेथे ग्रामीण, नागरी, जल, कृषी,आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रातील धोरणांची आखणी व संनियंत्रण अशी जबाबदारी त्यांनी नऊ वर्षे सांभाळली. २०२१ मध्ये हॉवर्ड वद्यापीठातून लोकप्रशासनात पदव्युत्तर पदवी त्यांनी संपादन केली. जॉन्स हापकिन्स विद्यापीठाने २०२२ मध्ये त्यांना 'मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ' प्रदान केले.राज्यात २०२२ मध्ये महायुतीचे सरकार सत्तेत आल्यानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. श्रीकर परदेशी यांची उपमुख्यमंत्री कार्यालयात सचिवपदी नियुक्ती केली. आता फडणवीस मुख्यमंत्री होताच डॉ. श्रीकर परदेशी यांची मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून त्यांना नियुक्ती देण्यात आली आहे. डॉ. परदेशी यांच्या या नियुक्तीचा जिल्हा परिषदेत पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. राज्यातील प्रशासनाचा गाढा लवकरच पूर्वपदावर येईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# 'कम्पाउंडर'च बनतोय डॉक्टर; बोगस डॉक्टरांच्या हातात ग्रामीणच्या नाड्या

अरुण जोशी

## ना डिग्री....ना रजिस्ट्रेशन......

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९अमरावती

ग्रामीण भागात एमबीबीएस डॉक्टर फिरकत नसल्याची बाब चिंताजनक आहे. त्यामुळे गावागावांत बोगस डॉक्टरांचे प्रस्थ वाढले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांकडे काही दिवस काम करणारे कम्पाउंडरच नंतर डॉक्टर म्हणून काम करताना दिसून येतात. उपचार स्वस्त दरात होत असल्याने रुग्णही त्यांच्याकडे गर्दी करतात. पण, या डॉक्टरांकडे कुठल्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची डिग्री किंवा रजिस्ट्रेशन नाही, असे असताना यांचा व्यवसाय धडाक्यात सुरू आहे. प्रशासन कारवाई करीत नसल्याने ग्रामीणच्या नाड्या बोगस डॉक्टरांकडून तपासल्या जात आहेत.

ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचे क्लिनिक धडाक्यात सुरू आहेत. यास कुणाचाही अडकाव नाही. प्रशासनाकडे बोगस डॉक्टरांची यादी आहे; परंतु कारवाई करणार कोण, असा प्रश्न अधांतरी आहे. जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या वतीने साधी पडताळणी होत नाही, कारवाई तर दूरदूरपर्यंत होताना दिसत नाही. परंतु, बोगस डॉक्टरांच्या उपचारामुळे सर्वसामान्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेकदा विपरीत परिणाम होताना दिसून येतात.गावखेड्यातील परप्रांतीय बोगस डॉक्टर काही दिवस एखाद्या खासगी डॉक्टरकडे कम्पाउंडर म्हणून राहतात. नंतर



विनाडिग्रीने आपलाच दवाखाना उघडून डॉक्टर बनून रुग्णांवर औषधोपचार करतात, असे चित्र ग्रामीण भागात पाहावयास मिळत आहे.शहराच्या बाहेरील रिकाम्या भूखंडावर तसेच गावखेड्यात परप्रांतीय बोगस डॉक्टर आपला तंबू ठोकून रुग्णांना आयुर्वेदिकसह इतरही औषधोपचार करतात, याची कुठलीही हमी नसते. अशात हजारो रुपये औषधांच्या नावावर उकळले जात आहेत. एका ग्रॅमसाठी १० हजारांपर्यंत पैसे घेतले जात असल्याचे वास्तव आहे.आपला व्यवसाय जोमाने चालावा व अधिकाधिक पैसे कमविण्यासाठी आजकाल रुग्णांच्या जिवाशी खेळ चालविला जात आहे. इतकेच नव्हे तर बोगस डॉक्टर अनेक दुर्धर आजार बरे केल्याचाही दावा करतात. याला आजाराने ग्रस्त असलेले सुशिक्षितही बळी पडत असल्याचे चित्र आहे.गावात उघडण्यात येणारे दवाखाने डॉक्टर विनाडिग्रीचे व कुठलेही रजिस्ट्रेशन न केलेले असल्याचे दिसून येतात. यामुळे हे डॉक्टर रुग्णांसाठी धोकादायक ठरू शकतात.

### बोगस डॉक्टरांचे ग्रामीणमध्ये थैमान

जिल्ह्यातील प्रत्येक गावखेड्यात एकतरी दवाखाना बोगस डॉक्टरचा असल्याचे दिसून येते. गावातच दवाखाना उपलब्ध असल्यामुळे रुग्णही वैद्यकीय उपचार करून घेण्यासाठी यांनाच पहिली पसंती दर्शवितात. पण, डॉक्टर बोगस आहे की नाही, याची मात्र कोणीही शहानिशा करत नाही. यामुळे गावखेड्यात बोगस डॉक्टरांचे जणूकाही थैमानच सुरू असल्याचे दिसून येते. चांदसी, बंगाली डॉक्टरांनी परिसरातील गावांत जम बसविला आहे.


### सारा खेळ 'पेनकिलर'वर !

बोगस डॉक्टर कोणत्याही आजाराच्या रुग्णांना परतवून लावत नाहीत, यांच्याकडे सर्वच आजारांवरील औषधोपचार असतातच, तो औषधोपचार म्हणजे पेनकिलर गोळ्या. या गोळ्यांमुळे तात्पुरता आराम पडतो; दायक ठरू शकते.

# जागतिक वारसा स्थळात 'लोणार'चा होणार समावेश युनेस्को समितीची दिल्लीत महत्वपूर्ण बैठक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९ नवी दिल्ली

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये लोणार सरोवराचा समावेश व्हावा या दृष्टीने आता प्रशासकीय पातळीवर हालचालींना वेग आला आहे. कालच अमरावती विभागीय आयुक्त यांनी लोणार येथे भेट देऊन पुरातत्व विभाग , नगरपालिका , वन्यजीव विभाग , महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अधिकाऱ्यांची बैठक घेतली.



२०२० मध्ये लोणार सरोवराला 'रामसर दर्जा ' मिळालेला आहे . आता युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये लोणार सरोवराचा समावेश व्हावा यासाठी प्रशासकीय पातळीवर जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. लवकरच दिल्ली येथे युनेस्को ची जागतिक वारसा समितीची बैठक होण्याची शक्यता आहे. या बैठकीत राज्य शासनाकडून हा प्रस्ताव ठेवला जाणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त निधी पांडे यांनी यावेळी दिली आहे.

देशातील ४० ठिकाणांना जागतिक वारसा स्थळांचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे लोणार हे ४१व स्थळ ठरणार आहे . या यादीमध्ये १९८३ साली अजिंठा व वेरूळच्या लेण्यांचा तर १९८७ मध्ये एलिफंटा लेणी , २००४ मध्ये मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक , २०१३ मध्ये पश्चिम घाट आणि २०१८ मध्ये मुंबईतील व्हिक्टोरिया गॉथिकचा समावेश झाला आहे.

लोणार सरोवर उल्कापातामुळे निर्माण झाले आहे. लोणार सरोवराची सरासरी व्यास १.२ किलोमीटर आहे. तर उल्का क्रेटर रिमचा व्यास सुमारे १.८ किलोमीटर आहे. लोणार सरोवरातील पाणी खारट आणि क्षारीय दोन्ही आहे . भूगर्भशास्त्रज्ञ, पर्यावरणशास्त्रज्ञ, पुरातत्वशास्त्रज्ञ, निसर्गशास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञांनी यांनी तलावाच्या परिसंस्थेच्या विविध पैलूंवर अभ्यास प्रकाशित केला आहे.

स्मिथसोनियन संस्था , युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे , जिओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, सागर विद्यापीठ आणि भौतिक संशोधन प्रयोगशाळेने या जागेचा विस्तृत अभ्यास केला आहे. आयआयटी बॉम्बेने केलेल्या २०१९ च्या अभ्यासात असे आढळून आले आहे की, तलावाच्या मातीतील खनिजे अपोलो कार्यक्रमादरम्यान परत आणलेल्या चंद्र खडकांमध्ये सापडलेल्या खनिजांसारखेच आहेत . नोव्हेंबर २०२० मध्ये तलावाला संरक्षित रामसर स्थळ घोषित करण्यात आले.




Digvijay Industries
पाणी तापविण्याचा बंब
कॅपिसिटी लिटर : ५०/१००/२००/३००/५००
■ कोणतही जळण ■ पाला पाचोळा
■ नारळाच्या झावळ्या ■ करवंटी ■ स्टेशनरी वेस्ट
■ किचन वेस्ट ■ कॉटन कापडाच्या चिंध्या जळण म्हणून चालते.
घरगुती वापरासाठी तसेच रिसॉर्ट, लॉजिंग, मंगल कार्यालय, धर्मशाळा, हॉस्टेल, कपडे वॉशिंग लाँड्री आणि गरम पाणी लागते अशा औद्योगिक कारखान्यासाठी उपयुक्त Mild Steel (MS) म्हणजे लोखंड आणि Stainless Steel (SS) मध्ये उपलब्ध, भारतात कुठेही ट्रान्सपोर्ट ने पाठविण्याची सुविधा उपलब्ध.
J79, एम.आय.डी.सी. कुपवाड, सांगली, मोबा. 9860274155

